म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७९९

3
काव्य

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सग्रहालय क्रमाक
लेखक
सन
पुस्तकाचें नांव

# अथविराटपर्वआर्या प्रारंभः

हे बुक सभेरद अनंत साठ्याचे
असे



॥ श्रींगणेशायनमः॥

वत्सल ताताधिक जो, गुरु धौम्य ज्ञानपुण्यराशि कवी॥
अति गहन राजसेवा, धर्म तया कुरुकुळेश्वरा शिकवी १
धौम्य द्रुपदपुराप्रति, जातां घेऊनि अग्निहोत्रास॥ ॥
प्रार्थूनि ह्मणे न शिवो, या यजमानासि अग्निहोत्रास २
सशतांग इंद्रसेनाद्यनुचर कृष्णाश्रयासि धाडून॥ ॥
पाठविला द्रुपदपुराप्रति दासीदासवर्ग झाडून॥ ३॥
गेले विराटनगरा, पांडव अज्ञातवासकामुक ते॥ ॥
चुकतें भावि नरि स्करवा, सूज्ञ श्रीकांतदास कां मुकते ४
जीं तच्छस्त्रैं प्राणां, आश्रय त्या संकटांत होय शमी॥ ॥
शिवमूर्तिसी श्मशानीं, तीचें वर्णून काय हो यश मी॥ ५
भेटोनि विराटासी, प्रथम युधिष्ठिर वदे मनोज्ञ असें॥
नामें कंक द्विज मी, धर्माश्रित अक्षकेलिदक्ष असें ६
ठेवी विराट बहु नृप, मानें सभ्यांत याहि सभ्यास॥ ॥
वर्ते नृपाश्रितांत, नृपआश्रितसा नसोनि अभ्यास॥ ७
मग भीम ह्मणे राया, मी धर्माश्रित लहानसा माजी॥ ॥

---

१ सर्व २ कृष्णादासस. पांडव. ३ शमीवृक्ष. ४ द्यूतक्रीडेमध्यें चतुर. ५ साक्षी.

आख्या वल्लव सेवा,होती प्रभुच्या महानसामाजीं॥८
स्वमहानसीं विराट,स्थापी पूजूनि बल्लवाला हो॥ ॥
हळहळुनि ह्मणे धर्म,स्वपदा हरिपादपल्लवा लाहो॥९॥
होऊनि मलिनवेषा,जातां राजप्रियेकडे कृष्णा॥ ॥
चित्तीं ह्मणे अहा बहु,अवघड हे उंबरे कडे कृष्णा१०
पाहुनि पुसे सुदेष्णा,बाइ कवण तूं असी दशा कां गे
कृष्णाश्रिता भुजिष्या,सैरंध्री मी असें तिला सांगे॥११
राज्ञी ह्मणे पाहाया,रूप असे ईश्वरीस नवसावें॥
कोण सचक्षु ह्मणेल,स्वगृहीं तुज सुंदरीस नवसावें१२
परि निश्चयें त्यजिल मज,पाहुनि तुज भूपसुकुमनीयेतें
वाटे विलोकितां जरि,हें अद्भुत रूप शक मनीं येतें॥१३
काय करावें म्या तरिं,जरि सुंदरि अनुसरेल पति तूतें॥
वद केंवि आवरावी,अमृतफलत्हना रसज्ञमति तूतें१४
दैवें सैरंध्रीपण,हें कांहीं काळ पातलें पदरा॥ ॥ ॥
पांचा गंधर्वांची,पत्नी मी पावलें कधीं न दरा॥ १५॥

६ स्वयंपाकग्रहांत. ७ नवसकरावे. ८ सुकुमारीला. ९ तुलाच्या फळांना. १० भया.

स्पर्शो न देचि बाई, स्वमींही मन्मना विवेक मळा ॥ ॥
गगनमणीकरिंच्या तम, केव्हां तरि काय हो विवेकमळा॥१६॥
हें वपु परभोग्य नव्हे, जो पुरुष बळेंचि हात लाविल या ॥
पावेल लय ज्योतिःस्पृक् जेविं पतंग मातला विलया॥१७
उच्छिष्ट चारितां मज, मज करवीं धुववितांचि चरणांतें ॥
नर कीं नारी पावे, मत्पतिपासूनि सद्य मरणातें ॥१८॥
तीतें ह्मणे सुदेष्णा, मन्निकट स्वस्थ तूं सये राहे ॥ ॥
त्वत्सख्यभाग्य दुर्लभ, याचें स्वप्नांतही न येरा हें ॥१९॥
मग तंतिपाळ नामें, राहे सहदेव होउनि खिलारी॥ ॥
हे कौरवलीला किति, न बकु हरिजनिं स्मरादिनिखिलारी२०
स्त्रीवेष क्लीबत्व, स्वीकारुनि गोकभूपतनयें तें ॥ ॥
इतरां परि तो न चळे, शिकवी नृत्यादि भूपतनयेतें॥२१॥
रक्षिति हरिहररूपें, परस्में ज्या अतिशय प्रिया बुबुळा॥
नामें बृहंनळा तो, होय धरुनियां करांत कंबु बुळा॥२२॥
नकुळ ह्मणे मीं ग्रंथिक, नामा हयशास्त्रजाणता राया॥
तो शालिहोत्र कीं हा, तुल्यचि अश्वांसि जाण ताराया॥२३

१ मूत्र चेहातांतील २ दीपावरस्नडपणारुणास ३ गुराखी ४ मदनप्रभृती ५ अर्जुनानें ६ बजारेस

ज्याच्याठाईं नांदे, सुनीति जसी दयाधिका रामीं॥ ॥
गंया करीत होतों, त्या धर्माच्या हयाधिकारामी॥ २४ ॥
मत्स्य ह्मणे आश्रय मी, तुज पल्वल जेविं मानससमराला॥
नरयान त्यापुढें किति, कामायेजें विमान समराला॥ २५॥
धर्माश्रितांसि आश्रय, मी लोकां हसवितील के विराट॥
परि शोभेलचि भासत, होता लोकांस वि तिलक विराट २६
ग्रंथिक ह्मणे नरेंद्रा, येथेंही स्पष्ट धर्म तो चि असे॥ ॥
ऐसें नसतें तरि हे, येते न प्रार्थितां कन्नास असे॥ २७॥
अज्ञातवासकाळीं, त्यांची कष्टा दशा वदावि किती॥ ॥
द्रव्यार्थ भीम अर्जुन, अन्नें लब्धांबरें तदा विकिती॥ २८ ॥
वरचेवर दे धर्म, द्यूत विजितपण धन स्वभावांस॥ ॥
समयज्ञ कवि न ह्मणतिल, कृपण असें त्या धन स्वभावांस २९
एकांतीं गुप्तपणें, भेटे चोरांसि जेविं चोरसखा॥ ॥
सहदेव ह्मणे बहुन्नळा, दिसतां ह्मा तुष्ट पुष्ट गोरसखा॥ ३०
स्वामीपासुनि नकुळहि, जोडी त्यात्वर्थ धन हयां सज्जुनां॥
अंतःपुरीं मिळाली, वस्त्रें अर्जुनहि दे तयांस जुनीं॥ ३१॥

१ मानससरोवरांतील हंसाला २ कविश्रेष्ठ ३ नकुल ४ द्यूतामध्यें जिंकलेलें द्रव्य ५ बंधूंस

दे[1]यितांसि द्रुपदसुता, भेटे भलत्या मिषें न दे विरहा ॥ ॥
तन्मति तिला ह्मणे पति, अतिमृदुल न भेटतां न देवि रहा ॥ ३२ ॥
तें अमृतवर्ष दर्शन, त्यांसि अदर्शन चिरोटन गरांत ॥ ॥
एवं मासचतुष्टय, ते क्रमिती त्या विराटनगरांत ॥ ॥ ३३ ॥
ब्रह्मोत्सवांत तेथें, ये साक्षान्मल्लकाळ जीमूत ॥ ॥
ज्याची आणी बहुतां, भुजरणनिपुणांसि काळजी मूत ३४
आहे कोण्ही मजशीं, भांडेसा हें सगर्व मल्ल वदे ॥ ॥
रंगीं[3] तया क्रियोत्तर, राजसभे निःसशंक बल्लव दे ॥ ३५ ॥
काळासीहि कराया, सिध्दचि तो धीर वीर भीम रणां ॥ ॥
कळतां सुयोधन पुन्हा, व्यसनीं पाडील याचि भी मरणा ३६
भीमभुजा[4]शनिपातें, बाहु[5]रणीं दुष्ट मल्ल तो चिरडे ॥ ॥
रंगीं[6] बहुगर्वें जो, हांसे फुगऊनि गल्ल तो चि रडे ॥ ॥ ३७ ॥
धरिती घडींत शतदां, ते म्लानि विकास सर्व मल्लास्यें[7] ॥
जिष्णु[8] ह्मणे न धरावा, जनरंजनरंगगर्व मल्लास्यें ॥ ३८ ॥
फिरउनि शतदां केला, पिष्ट सि तिवरि[9] संलील आपटुनी ॥
तें प्राशिलें नियुध्दा, मृत नयनमुखीं[10] करूनि आ पेंडुनी[11] ३९

१ नव-ग्रामी २ चिरकाळपरिभ्रमणविषांत ३ तालिमखान्यांत ४ वज्र ५ मल्लयुध्दीं
६ ताल्मींत ७ मल्लमुखें ८ अर्जुन ९ माध्यान्हत्यांत १० मर्कोड ११ ज्ञात्यानी

रायें प्रसन्न होउनि,देतां निजवस्त्र रत्न धन दानें ॥ ॥
राय ह्मणे भीम जया,पूजावें यत्न करुनि धनदानें ॥४०
मग भीम करी हर्षें,पुरवाया राजदारकाम रण ॥ ॥
कृष्णा ह्मणे सख्या हरि,देशि न मज तूं उदार कां मरण ४१
दशमास कमिति असे,प्रभुसम मतजे सदार विश्वास॥
अत्युष्णदीर्घ सोडी,ज्यांसि विलोकुनि सदा रवि श्वास ४२
कीचकनामा सेनापाल श्यालप्रसिद्ध राजाचा॥ ॥
भंगूं पाहे कृष्णाव्रत वांछी अभ्युदय धराज्याचा॥४३॥
भगिनीस ह्मणे पूर्वी,आढळली या न हें मला भवनीं ॥
वाटे जन्म दरिद्रा,झाला बहु कोटि हेम लाभ वनीं ॥४४॥
मोहेल इला पाहुनि,शक्रहि मग अन्य कां न नर मोहे ॥
मजसीं अधः कराया,अहिसुरनरकन्यकानन रमो हे ४५
लेब्ध तदनुमोदन तो,जंबुक सिंहीस कीं सकाम ससा॥
व्याघ्रीस सतीस बळें,ग्रांतीस वरावयासि नामससा ४६
रावणसा बहु विनवी,प्रेम प्रत्यक्षरींहि नव दावी॥ ॥
कीचक नीच कलुषनिधि,त्याची आर्यांत गोष्ट न वदावी४७

१ कुबेरानें २ मेहुणा ३ भगिनीनें ज्यास अनुमोदन दिलें असा कीचक

मळवूं पाहे स्वबळें, या श्रुतिला काय नीच कलि हा.या ॥
देवासुरवसुखमळजळनिधि, खळपतिपंक्तींत कीचक लिहावा ॥४८
कृष्णा ह्मणे अहाहा, बुडती तरि भजति नीच कामातें ॥
सावध हो गा वध हो, न व्याळी जाण कीचका मातें ॥ ४९ ॥
परदारा मी मत्पति, गंधर्व प्रबळ उग्र निर्वंशील ॥ ॥
मागें मरविल तरविल, मरविल जरि मज बळेंचि शिवशील ॥५०
प्रिय पांचजन्य जीस, प्रिय नैतर त्या भुजेसि कंबु कसा ॥
झिडकारिला सतीनें, सिंहीनें दुष्टबुधि जंबुकसा ॥५१॥
बंधु भजो पति न भुलो, ह्मणउनि संताप द्रुस्व सामान्य ॥
ती त्या कार्यासि करी, जरि न करावें पर स्वसा मान्य ॥५२
ती तीस ह्मणे कीचक, सदना जाऊन आण गे हाला ॥
धाडी बळें वृकाच्या, घालुनि हरिणीस आण गेहाला ॥५३
कृष्णा ह्मणे न जाइन, जेविं मृगी वृकबिळा विटागारा ॥
साधु गृहा धाड परम, नम्रा तत्पथशिळा विटा गारा ॥५४
उचित स्रुचि तरिंच नृवपु, ब्रनम्र ह्मणऊनि देवि टाळावें ॥
ह्मणति विट विटाळावें, परि वेद ह्मणो न दे विटाळावें ॥५५

१ राव ॥दिभक्तसमुद्रने खळपतिसांच्यापंक्तींत २ निवारशार खे ३ नंतर ४ सामान्यरांग्र
५ कौ० ह्यासारखा ६ मद्य ७ जारगृहा ८ निवारावें ·

विनवी ऐसें बहु परि, तीस सुदेष्णा ह्मणे तरी जाच ॥ ॥
कारचि बरी निरयगति, परवशता ज्ञानगुणें करी जाच ५६
ती आपणा ह्मणे हे, द्रौपदि तुजवरि हरीच विटला गे ॥
चुकलीस तूंचि नसतां, पदरीं अघ पाठिला न विट लागे ५७
ज्या श्रीकृष्णसखीतें, योग्य नैमाया सुरासुर सती ते ॥
प्रेषी आणाया ती, राज्ञी मानुनि सुरा सुरस तीतें ॥ ५८ ॥
जातां परार्थ ही बहु, तापातें पावली सुरामा ती ॥ ॥
न करील कां पित्याची, दुर्गतिची माउली सुरा माती ॥ ५९
कीचक विलोकुनि ह्मणे, त्रिजगद्गुरु विष्णुच्याहि आलीस
रंभाचि सुदति तूं या, नैलकूबर मंदिरासि आलीस ॥ ६०
त्या संकटीं सतीनें, दीनाचा बंधु कृष्ण आठविला ॥
त्या सवितृमंडलस्थें, राक्षस रक्षार्थ गुप्त पाठविला ॥ ६१
सर्वस्व अर्पितों तुज, देवि करी पूर्ण काम हो दारा ॥ ॥
विकत मिळतां स्मितसुधा, केवीं घेवीं न कां महोदारा ६२
इत्यादि नीच कीचक, दुष्कर्माची धरूनि आस वदे ॥ ॥
कृष्णा वदे सुदेष्णे, करितां पात्रीं भरूनि आसव दे ॥ ६३

१ नरकवास २ जाचणूक ३ नमनकरण्यास ४ मखीस ५ कुबेरपुत्र ६ सूर्यमंडळीं राहा
[illegible]

तो कर धरुनि खळ ह्मणे, दासी आहेत फार अन्या या ॥
बैसा शायनीं राज्ञी, करिते करऊनि दास्य अन्याया ॥ ६४
कर आसुडितांचि पडे, धडडड वात्यासवें जसा विटपी ॥
कैचें तेजबळ तशा, दुर्वृत्ती जो सैरारसा विट पी ॥ ६५ ॥
तवकें उठोनि धाउनि, पळतां कवळूनि नीच केंबरीतें ॥
नृपति समक्षहि पाडी, लत्ता हाणोनि कीचक बरीतें ॥ ६६
तों तो राक्षस पाडी, मागें ढकलूनि कीचकालाही ॥ ॥
जाणों गरुडें उडवुनि, आपटिला मत्त नीच कोलाही ॥ ६७
पाहे विराट निकटस्थित धर्म तदंतिकस्थ भीमहि तें ॥
न सतीस लात बाधे, जेविं पुन ररण्यवासभी महितें ६८
आस्तीक शपथ अहिचे, कीं हरिचें आवरी बळ खलीनें
धर्म तसें भीमाचें, तो ह्मणतां भूखळीं खळ खलीन ६९
भीमांगुष्ठासि धरी, स्वांगुष्ठें धर्मराज दडपून ॥ ॥
नाहीं तरि तेव्हांची, श्येनें तसा मारिताचि झडपून ॥ ७०
रोधी युधिष्ठिराज्ञा, वेळा भीमार्णवाचिया वेगा ॥ ॥
नाहीं तरि जगदंतक, पूर तया तेथवांचि यावे गा ॥ ७१ ॥

१ वावटळीनें २ वृक्ष ३ मद्यास ४ केशसमूहातें ५ कृष्णसर्प ६ पृथ्वीस ७ अश्वातें
८ लगाम ९ ससाणा १० मर्यादा

कृष्णा रडत ह्मणे या,रायावरि धर्मनीति विटताहे॥ ॥
कैसी उपेक्षितां हो, सभ्यश्री कीर्त्तिहानि विटता हे॥७२
प्रेमें रक्षितिल सदा, ह्मणूनि दिल्हिमि जयांसि मैत्रातें॥
तेगंधर्व उपेक्षिति, मज कां कां मारिती न सत्रातें॥७३॥
शुचि वपु तें योग्य नव्हे, सेवाया ऽ योग्य कीचक सळातें॥
जें राजहंस सम्मत, तुडवितसे काक नीच कमळातें७४॥
ज्या नीति सतीची बुध, मान्या अत्युच्च पायरी तीतें॥ ॥
दासीपरि पाहेहा, नुमजेचि विराटराय रीतीतें॥७५ ॥
भूप ह्मणे मज तुमचें, कलिकारण न समजेचि तर्कशतें॥
नुमजुनि मधुरहि वदतां, लागे गोळी परीस कर्कशतें.७६
कंक ह्मणे सुज्ञे जा, त्वां न अनाथा समान वरडावें॥ ॥
ते गांजितां परें स्वस्त्रीतें नह्मणेल मानव रडावें॥७७
गंधर्व त्वत्पति कीं, तरि ते स्वसमर्थ देशसमयज्ञ॥ ॥
धीरां न अन्य मान्य, श्रितरक्षण कीर्त्तिलेश सम यज्ञ ७८
तेथुनि राज्ञीपाशीं, जाऊनि ह्मणोनि तात अंब रडे॥ ॥
फोडी जैशी व्याघ्र, विमुक्त कुळभ्रष्ट धेनु हंबरडे॥७९॥

१ कंटाळत आहे २ नारपणा ३ माझ्या बापानें ४ भांडण्याचें कारण ५ शिवीपेक्षां
६ कळपांतून चुकलेली

कळतां ह्मणे स्वदेष्णा, नाहींच विचार कीचकीं अधर्मी ॥
सखि उगि जरि ह्मणसिल तरि, करिन नव सुखार्थ बंधुचा वध मी ॥
कृष्णा ह्मणे वधावा, भ्राता त्वां कां तुझा न अपराधी ॥
पति गंधर्व न दुर्बळ, माझी प्रार्थील किमपि न पराधी ॥ ८१
निज दुःखाहुनि केवळ, कनकनगास हि गणी लहान सती ॥
तें द्वारकापुर तसें, आणी बहुधा मनीं महानस ती ॥ ८२ ॥
जाय निशीथीं साध्वी, दावी तिस तत्प्रभाचि वाट नमीं ॥
चिंतांत ह्मणे भीमा, दैयिता दैयिता नसेन वाटत मीं ॥ ८३ ॥
पाहून ह्मणे भीमा, आश्चर्य तुज काय हें महानस हा ॥
न यशोहानि सहा गा, सुज्ञा सेह काय हें महानसें हा ॥ ८४ ॥
साश्रु गळां पडुनि ह्मणे, मेलां किंवा तुह्मी अहो सासू ॥
होतें ह्मणत अयाली, माझीच रिपुक्षयावहा सासू ॥ ८५ ॥
मी काय भली निद्रा, सुखदात्री काय हा लहान सखा ॥
गमलें वपुचि यशोधिक, तरि अन्नचि धरुनि हे महानस खा ८६
निजलां काय मृतापरि, जागे व्हा सिंहसे उठा राहो ॥ ॥
निद्रा कीर्ति वराहो, हींप्रद हा बाहु भृगुकुठारा हो ॥ ८७ ॥

१ अयारा २ बुद्धि ३ हे प्रिया ४ स्त्री ५ सह्य ६ स्ववर्णहानि साहणाऱ्या ८ सजीव
९ यशःनाशाकर्त्यास १० लज्जादेणारा ११ भार्गवराम

भीम गडबडोनि उठे, अंकींच निवास नीस दे वामी ॥ ॥
चित्तीं ह्मणे बहु दिसां, ओंतळलों या सतीस देवा मी ॥ ८८ ॥
दडूने कां आलीस, प्रमदे हा आर्द्र कां पदर ज्याये ॥ ॥
भ्यालीस भीरु भय कां, भेटे त्यालाचि कांप दर ज्यो ये ॥ ८९ ॥
तूं काय भार भामिनि, उतरसि मांडी वरूनि कां बस ये ॥ ॥
झालें काय वद रुदति, रुमुखि सति रडूं नकोचि थांब सये ९०
देवी ह्मणे पुसतसां, जाणुनिही खेद काय मातें हो ॥ ॥
विनवा तुह्मी तरि रुलत, जें बंधु छेदका यमातें हो ॥ ९१ ॥
पुसतां नसे स्मृति ह्मणुनि, बहु उत्तम सांगत्यें बरें परिसा ॥
परि साच निजा नांकीं, लोहाची भीड काय जी परिसा ॥ ९२ ॥
कृष्णा सखी द्रुपदसुता, धर्मस्त्री सून पांडुराजाची ॥ ॥
कविगण गणपति गाती, कीर्त्ति सुधासिंधु पांडुरा ज्याची ९३
कवि जीस राजसूया, माजि व्यापुनि मही नभा गाती ॥ ॥
झाली विराटसदनीं, सैरंध्री परम हीन भागा ती ॥ ९४ ॥
जी कुरुसभेंत नेली, द्यूतजिता किंकरी ह्मणुनि अरिनी ॥
बहु घाबरीच केली, जसि देउनि हांक हस्तिनी हरिनी ॥ ९५

१ डाव्या २ भेटलों ३ स्त्रिये ४ भय ५ ज्यापासून ६ ऐका ७ स्वर्गी ८ क्षीरसागरासारखी स्वच्छ ९ सिंहानीं

कीचक नीच कर तिचा, धरि परि हरिची सखी न अनुसरली।
कर आसुडितां पडतां, खळ तेथुनि दूर ती सुतनु सरली॥९६॥
[1]खळ दुर्दशार्थ सोडिन, होनाची त्यजुनियां दया लुगडी॥ ॥
स्मरतांचि भीड पडली, जीची दीनाचिया दयालु गडी॥९७॥
पळतां पाठिस तीच्या, लागे वेणी धरूनि दे हिसके॥ ॥
स्वकराग्रें हि शिवाया, न रवि जिच्या कांतिसंपदें हि सके ९८
लत्ता हाणुनि मूर्छित, केली सुकुमार मूर्ति भूपानें॥ ॥
अजि सोसलें कसें पति, हृदया सोसेल सभ्य भूपातें॥९९॥
पद्मा वृद्धि करितसे, सुयशाची वृद्धि मृत्तिका कीची॥ ॥
[6]हरिनीं [7]श्ववृत्ति वरिली, कीं हंसानीच वृत्ति काकांची॥१००॥
तेज तुह्मा असतें तरि, उरता हाणोनि न विट लातेला॥ ॥
[9]अहितायुला न पीतां, तेजस्वी दीप न विटला तेला॥१०१॥
देवा वांचाया हे, स्त्री [10]मातीसीच तुडविली लाजो॥ ॥
तोहि पती उद्धरिना, अरिनें व्यसनांत बुडविलीला जो १०२
हे स्त्री नव्हे प्रतिष्ठा, तुमची जरि ईस सोडितां [11]पाणी॥ ॥
[5]धर्मेंच्या ऽर्थेंच असे, वदलां कां प्रथम जोडितां पाणी॥१०३

१ दुःशासन २ कृष्णास ३ स्वकिरणानीही ४ भूमिपानानें ५ कची ६ सिंहानीं ७ श्वानवृत्ति ८ जार ९ शत्रुच्या आयुष्यास १० मातीसारखी ११ हात

निस्तेज मीहि दीपक, वर्तिहर जसा खराखु रोमेला॥ ॥
श्रीरामाच्या हरितां, तत्तेजें खळ खराखुरा मेला॥ १०४॥
मज मरण असह परिहें, दुःसह बहुधा तया न रोमेला॥
रक्षी वरूनि जो जन, ह्मणती बहुधा तया नरा मेला१०५
दावी रडोनि जाले, जे गंध उगाळितां स्वहात किणी॥
भीम ह्मणे विधि लेखनि, लेखनिं नच वचकलीस घातकिणी
नेत्रें पुसोनि कवळुनि, भीम सतीला ह्मणे उगी न रडें॥ ॥
अज्ञातवास नसता, तरि अरिचें तेंचि मुरडितों नरडें१०७
धर्माज्ञेतें भ्यालों, मी साधिं न अंधनंदनगदेतें॥ ॥
अरव गुरुवचोनुगचि वपु, दे न अरसगंध नंदन गं देतें ८
एकांत नृत्यशाळा, शयनीं भेटे असेंचि कर जोये॥ ॥
येइल तसेंच माझ्या, नृहरीच्या यश जसेंचि करजा ये॥९
काळाहि न भीजी सति, स्त्रीश्वरि भ्यालीस काय अल्पाया॥
कल्याच्या सत्य स्मित, कर ह्मण नृत्यालयस्थ तल्पा या॥१०॥
कल्पाग्निपुढे कूपीं, लपे राहील काय ओलावा॥ ॥
गरुड ह्मणतां प्रतिभटा, वांचेल कसा ह्मणोनि ओ लावा११

---

१ दीपकाचीवातहरणकरणारा २ घरवरउंदीर ३ सांतला ४ स्त्रीला ५ घट्टेपणाने
६ लिहितानां ७ गुरुवचनपालनांतच ८ अंगे ९ स्त्रिये १० नखांस ११ वाटण्यासाठीं
१२ नाटकशाळेंतीलशय्येवर १३ पक्षिविशेष

उत्साह भरें हृदयीं. पूर्वी पौथोधि साचि यादतमी ॥ ॥
पूर्वींच नृत्यशाला शयनीं जाउनि नमेन गादतमी १२ ॥
मुळमुळ रडोनको सति. सीतेसहि सोडिलें न भोगानें ॥
तेज असोनिहि वरिलें. काळकृताऽभ्युदय लय ने भोगानें १३
हरिभक्त छळ करितां. तत्काळ उलेल कां न नीचोर ॥ ॥
निश्चय सेंडून हरितां. निजमार्गे फळेल काननीं चोर ॥ १४
करवुनि खळवध निश्चय. तेथुनि गेली सती स्वशयनातें ॥
कंठीं क्षण स्मरोनि. प्राणसखा पुंडरीकनयनातें ॥ १५ ॥
गाठी तिला पुन्हा तो. खळ जेविं पतंग दीप कलिकेला ॥ ॥
प्रार्थुनि ह्मणे सुमुखि मज. भज तुजसीं म्या चुकोन कलि केला
सुंदरि विराट राजा. नावाचा जाण साच मत्स्य पहा ॥ ॥ १६
शृंगाररसतरंगिणि. तळमळतो संगमार्थ मत्स्य पहा ॥ १७
जरिहा विराट राजा. तरि कांही काल कां न वदलागे ॥
चन्द्रकलत्र युध्या मज. हें तेविं पहावयासि पद लागे १८
त्यासि खरें भासेसें. प्रियशिक्षित सस्मित स्वयें वदली
परि कांपली सतीची. ननु जेसी मंदमारुतें कदली ॥ १९

---

१ समुद्रासारखा २ सूर्यानें ३ नीचनर ४ साधूचें द्रव्य ५ रुष्णातें ६ कलह ७ मत्स्य देशाचास्वामी ८ रुद्रस्त्री

खळ पाय धरूं पाहे, स्मरमति ह्मणे कास्या नंति सेरा होहो
परि पात्र निज रहस्या, भ्याला वा दास या न तिस राहो ॥२०
नें वाटे त्या होला, पानाद्यतिपातकायना सत्य ॥ ॥
मग मनिं ह्मणे पित्याचा, पाहतसे हान काय नासत्य ॥२१॥
कल्या सकतात, ता निज रमणासि सूचवी रमणी ॥ ॥
विट दृष्टितें कलत्रीं, भावी स्वनखांत सूचि वीरमणी ॥२२
त्या शून्य नृत्यशाळा, शयनीं सांजेचि गुप्त भीम निजे ॥
जागति ते स्वाकारें, भुजगांच्या नित्य देति भी मनिंजे ॥२३
झाली शाळा केवळ, कृष्णा पोषूनि अंधकारा ती ॥ ॥
जाणों स्मयशोर्ष नमो, गुण धाडी तेथ अंधकारा ती ॥२४
चित्तीं भीम ह्मणेहो, स्मरवर ह्मणवूनि हास्करापसदा ॥ ॥
धिक्धिक् छीछी ह्मणवुनि, घेइल लोकांत हा स्मराप सदा २५
आला त्या साध्वीसीं, इच्छुनि जो परम नीच कामरण ॥
प्राप्त न होईल कसें, त्या मद्य मदांध कीचका मरण ॥२६
गाहे शयनीं निजला, होताजो कांत कीर्तिवरटांचा ॥ ॥
असल्या ज्याच्या दुर्जन, नागफणा रूप कीर्ति वरटांचा ॥२७

१ नमन २ इच्छा ३ होवो ४ मद्यपानादि अतिपातकांचें स्था. ५ अश्विनीकुमार ६ सयी ७ पुष्टकरून ८ शिव ९ कीर्तिरूपहंसिणींचा

जो चांचपी न याच्या मृगपतिच्या जेंवि फेरु आंमातें ॥
करिती करकर जाणां ह्मणति जंडवरासि मरसि कां गातें २८

आलों तुज भेटाया. घेउनि सर्वस्व हें उपायन हो ॥ ॥
प्रमदे त्वसासीस्तव. बहु केला विफल हा उपाय नहो ॥ २९

असता दीप तरि स्रमुखि मानुनि मज मूर्ति मदन रमतीस
लटकी ह्मणूनि हृदया. माजि न देतीस पद न रमतीस ॥ ३०

हलुच ह्मणे भाम तुह्मी स्रमहागुण नदनदीप कीं शाला ॥
दीप प्रकाशती कीं. पाहुनियां वदन दीपका शाला ॥ ३१ ॥

तुमचें लोकांत अहो. कीचक सामान्य काय होशील ॥
परि तूं वैरटेसि कैरट नीच कसा मान्य काय होशील ॥ ३२

संगासि उर्वशीच्या. स्वर्भी तरि काय गाढवा लाहे ॥ ॥
सैरंध्री वीरवधू यातुज नरकाय गाढवाला हे ॥ ३३

नारद ह्मणे मिळविलें. यश निर्मुनि हेंचि रत्न मत्तानें ॥
वंदावें माथां कीं. तुडवावें त्वां धुळींत मत्तानें ॥ ३४ ॥

धरितोसि जीविताशा. तूं गरलप मंद नीच कां शाला ॥
नरक कर्दमें ही आतांचि भरेल कीचका शाला ॥ ३५

---

१ सिंहाच्या २ कोल्हा ३ मूर्ख भेटासि ४ करालां ५ हंसितीस ६ कावळा ७ नपुंसकास ८ नरदेहधारी ९ विषपानकरणारा

भगिनी रडेल तुज अनु, मोडुनि नरकालयासि पाठउनी ॥
दुर्मंत्री सखपावे, जी हे मंतांत जेविं पाठउनीं ॥ ३६ ॥
ऐसें बोलुनियां धृत, खळगल बेलजलधि तो भाला बुकली
पावेल जय कसा प्रभु, सेतुसवें करिल जो अॅलाबु कली ॥ ३७
माणा मुकेल इच्छुनि, सिंहीचे गजहि सबहुमान मुके ॥ ॥
मीं न मुके कोल्हाकां, छी ह्मणतिल त्या जनाधामा न मुके ॥ ३८
प्रबळासीं करिल स्त्री, स्तव ओंमृनि कोंन नीच मूढ कली
स्रकवि हि दशमुख निजतनु, सह काळ हृकाननीं चमू ढकली
अस्याकरवी स्मरवी, मधुसूदन चरित जें पवन भूतें ॥ ॥ ३९
कांपवि शेषफणेतें, न विराटाच्याचि त्या भवन भूतें ॥ ४०
दावी दुरूनि नरक, ग्रामाची भीम कीचका वेस ॥ ॥
कलिमाजि लघुत्वप्रद, शक्तीस नसेचि नीच कावेस ॥ ४१
जें स्रयश पाकशाळा, मिरवी न, हँते भके सरि गुहांतें ॥
हे किति असोनि युद्धा, विषयीं याची न ये सरि गुंहातें ॥ ४२
जातां भीम ह्मणे गे, अपराध तुझा करूनि पर[11] मेला ॥
वांचेल नीच कीचक, कैसा लावून पाय परमेला[12] ॥ ४३ ॥

१ उन्हांत २ बळ समुद्र ३ रामकृत सेतूसी ४ भोपळा ५ मग ६ मरे पर्यंत ७ गज वधकरणाऱ्या सिंहाची गुहा ९ बरोबरी १० कार्तीकस्वामी ११ शत्रू १२ भेष

त्या सीतेला वायस, वायस सा तुजहि कीचक विटाळी॥
त्या याहि दंडितां भू, साहे दोषासि नीच कवि टाळी॥१४४॥
व्यसनीं प्रभु रक्षी मी, काय विसरलीस काय गे हरितें॥
तत्स्मरणदीप नसतां, व्यापिल तम कां न काय गेह रितें॥४५॥
ऐसेचि खल चिदारुनि, देइल बहु लाज भीमकर पविला॥
ज्या हीन हेंच चित्तीं, तोहि सतीकांत भीमें करपविला॥१४६॥
गुर्वाज्ञा ह्मणुनी जों, जाय सती मृतविटासि लक्षाया॥ ॥
मानी दिधला काळव्याघ्राला मांसपिंड भक्षाया॥१४७॥
स्मित करुनि ह्मणे पापा, कां रे प्राणादि सर्वहानीच्या॥ ॥
बीजा व्यभिचारित्वा, भजलासि धरूनि गर्व हा नीच्या॥४८॥
साध्वी तेथूनि निघे, चिंती पतिभुज मनांत हरि सारे॥ ॥
राजसभापाळांतें, दूरूनि ह्मणे समस्त परिसा रे॥१४९॥
मत्पति गंधर्व तिहीं, सोडविलें वधुनि कीचका मातें॥ ॥
मेले दशाननादिक, तरि वश होतात नीच कामातें॥१५०॥
सैरंध्रीनें कथितां, कीचक वधवृत्त धांवले लोक॥ ॥
तदनुज उपकीचकशत, ससुदेष्ण विराट पावले शोक॥१५१॥

---

१ एकी २ शरीर गृह ३ वज्राला ४ कृष्ण ५ शिव ६ सर्वलोक ७ सर्वस्व

तें देखतखबाला, आलिंगुनि दूर राहिली होती ॥ ॥
कृष्णा मत्तबंधूनी, साश्रूंत निरश्रू पाहिली होती ॥५२॥
बकुधा काळ ह्मणे तिस, माझ्न खळ तव बळें नसे दूर ॥
अरिरक्तपहाहृत्कृप्रिय गणपमुखस्छहि असा न सेंदूर॥५३
खळ ह्मगती सस्मित मुरि, ही सैरंध्री पहा उभी मरण ॥
गुरु पावला यदर्थे, करूनि पतीसीं जिच्या सभीम रण॥५४
हूं आण बांधा हो, एकाकी वीर हा न सेउ च्चिता ॥ ॥
मेला स्वकामसंगें, तत्सद्गगति कसि इला नसे उच्चिता॥५५
भावोजी जेणें या, दासीस प्राप्त होय सुरतो तें ॥ ॥
वाइट कं्य ह्मणा हूं, स्वर्गी दोघे करूत सुरतातें॥५६॥
चालविली कृष्णसखी, बांधुनि जसि ती स्वबंधुच्ची किरेंडीं॥
चिरडी तत्काळ न त्यां भीम विवेकी भला न तो च्चिरडी॥५७
नेतां सती ह्मणेंजरि, वधिता मज मारितां न हा कामी॥
गंधर्वराजसुतहो, दीनापरि मारित्यें न हाका मी॥५८॥
धावा उडीच्च घाली, मानी घाली न नीच्च कांस रणीं ॥
रक्षा स्वकीर्ति घालूं पाहति मजसह्नि कीच्चकासरणीं॥५९

१ दृष्टी समीय २ देवपणा ३ तिरडी ४ चिरडखोर ५ कान्चा

श्रमला परि भीम उठे, स्नुषे व्याकुळ न हो असें तिजला ॥
गजगांजितों व्रतस्था, सिंही राहेल सिंह कां निजला ॥ ६० ॥
निजवेषासह टाकी, प्राकारावरूनि तो उडीला हो ॥ ॥
कां जीव ह्मणेल पतन, जरि हें लाहेल तरि कुडीला हो ॥ ६१ ॥
घाया त्या दुष्टांच्या, जनु अंतःपूरच्चर विलापाला ॥ ॥
जाउनि पुढें च्चि भीमें, तरु उपटुनि त्यासि नुरविला पाला ॥
बा विटलासि स्नबिरुदा, केविं असें केशवा सहंस तीला ॥ ६२ ॥
जाळावयासि घेउनि, गेले जों ते शवासह सतीला ॥ ६३ ॥
तों तो गर्जोनि ह्मणे, हा आलों सर्व मारितों खळ गे ॥ ॥
हे केवळ कंटक या, राष्ट्रीं न वरे जसे पथीं खळगे ॥ ६४ ॥
बहु खळबळे खळबळ करि, पाहुनि कुरुनायका द्रवे यश तें ॥
अद्भुत पक्षिपतिपुढें, ठाकावें काय काद्रवेयशतें ॥ ६५ ॥
त्यजुनि पळाले पंचोत्तरशत मनुजाकृती पशु चितेतें ॥
जिं साहतील केंसें, शुचि दुःसह तेज अशुचि ते तें ॥ ६६ ॥
भीमप्रतापतपनें झाले बहु शुष्क ते जसे पळवे ॥ ॥
पळ वेंचे तों गाठी, हरिणाला हरिपुढें कसें पळवे ॥ ६७ ॥

---

१ तरावरून २ होगे ३ जन्म ४ साहस ५ खळसैन्य ६ गरुडापुढें ७ सर्पशतांही ८ युद्धा ९ पाचोळा

वधिले खळ अपराधी, गरुडें अहिसे न लागतां पळते ॥
वधिताचि भीम म्हणुनि, जरि लंघुनि सप्तसागरा पळते ॥ ६८ ॥
पुष्पोत्कटाचि दुसरी, गणितील अजाण कीचक वितीतें ॥
जी कृष्णा साध्वी कां, म्हणतील न जानकी च कवितीतें ॥ ६९ ॥
भीम म्हणे करिन तुझें, सति मर्दुनि रिपु ज्ञातांऽयुतें हित मी ॥
बुडवी बळें अकाळीं, सद्वेषे महाज्ञातांयुते हि तमीं ॥ ७० ॥
छळिलें दशाननें परि, झालें प्रभुदार काय कातर तें ॥
भीतां दृढ्ढासि कसे, हरिजन भवसिंधुनायका तरते ॥ ७१ ॥
जें कर्म सिंधु इतरां, मज हरिदासासि ओंड वाटे तें ॥ ॥
जा तूं आल्याचि पथें, जातों मी धरुन आडवाटेतें ॥ ७२ ॥
जोडुनि यश मिरवे जन, परि भगवज्जन कशास मिरवेल ॥
बहु पानवेल मिरवी, तेंविं न मिरवी यशास मिरवेल ॥ ७३ ॥
ज्या स्तवुनि हरि म्हणे, हरि भुज कवि आम्हांत पोरवा घाला ॥
त्याहि जसे ते भ्याले, स्वर्गीं हि तसे न पोर बाघाला ॥ ७४ ॥
भींचें चतुर्थीं कृष्णा, देह चि बहुधा कलोपे हा याला ॥
स्त्री बाळ वृद्ध साधु हि, पुरजन बहु धाकला पहायाला ॥ ७५ ॥

१ राक्षसमाता २ कीचकाचे आईस ३ साधुद्वेष ४ मोठ्या ज्ञातायुपुरुषांसहि ५ सीता ६ भयभित ७ सुखदुःखास ८ मकरामुद्र ९ कूप १० भयपावे – नक्षत्रामध्यें ११ गणेशचतुर्थी – रोहिणी १२ चंद्र

स्त्रीस विराट ह्मणे गे, सैरंध्रीला निरोप दे विनवी ॥ ॥
ह्मण तीस त्वदतिक्रम, जन्यें यावी भयें न दे वि-नवी ॥ ७६
भुलविल गंधें रुचिर, स्त्री मूर्तिमती स्मरा न राहो ती ॥
दुःसह कामविकार, स्त्रीरत्नास्तव स्मरां नरां होती ॥ ७७ ॥
गंधर्वभयें कांळिज, धडधड उडतें करें पहा गे हें ॥ ॥
त्वद्बंधूंचीं झालीं, युगपत् शून्योत्सवें माह्या गेहें ॥ ७८ ॥
येतां मार्गे पाहे, यद्वारीं भीम ते महान सती ॥ ॥
स्वविवाह मंडपांगणिं, मानी वृत्तोपयम महानस ती ॥ ७९
स्मित करुनि ह्मणे त्राल्या, त्या गंधर्वाधिपा असो नमन ॥
विसरेल करें व्यसनीं, अभयें स्मरवपावलें असोन मन ॥ ८०
बल्लव ह्मणे विराजे, पाणि श्रितसमेवनें न वलैयत्रातें ॥
केलें कलत्ररक्षण, पतिनें तरि काय हो नवल यत्रा तें ॥ ८१
ये उत्तरा पहाया, सांडुनि गाण्यास नाचण्यास हि ते ॥ ॥
केंवि ह्मणेल रसज्ञा, सोडुनि शालीस नाचण्यास हिते ॥ ८२ ॥
रोमांच तिच्या देहीं, विजयश्रवणीं उभारती वाटे ॥ ॥
भ... खळ बळें विजयी, साक्षाद्देवीस भारती वाटे ॥ ८३ ॥

---

१ ज्ञात विवाह बोटनें. २ आश्रितरक्षणानें. ३ कंकणांनें. ४ खळसैन्यनिंक.... ५ सरस्वती।

गे सखि सैरंध्रि कसें, झालें कसि गे सुटोनि आलीस॥
ऐसें बृहन्नडाही, तीसपुसेंजेविं आलि आलीस ८४
तीस ह्मणे सैरंध्री. तुज मजसीं काय उत्स वद नातें॥
स्पर्शेल वृत्त वदतां, खळनाम प्रास कुत्स वदनातें ८५
तुज लाभ काय यांत. व्यासंग त्यजुनि नृत्यगानाचा॥
जा सकळा महृत्त, श्रवणानें काय कृत्य गां नाचा ८६
बोले बृहन्नडा प्राक्सहवासें दुःख मज तुझें शिवतें
नेणे जन मन साक्षी, विश्वाचा एक जाणतो शिवतें ८७
गेली राजगृहीं तों, तीस सुदेष्णा ह्मणे न कोपावें॥
सैरंध्री भूप भितो, तूं या नगरीं वसों नको पावें ८८
कृष्णा ह्मणे त्रयोदश, दिवस वसोंदे असेंचि वद राजा
अयश न यावें तुमच्या, यावें अस्वल्प सुयश पदराज्या ८९
येथुनि नेतील मला. गंधर्व बहु प्रसाद करतील॥
हरितील ताप तुमचे, ज्ञातिस पूर्वजहि कीर्ति वरितील ९०
वदतां असें समंजस. मग केविं ह्मणेल तीस ती जाच
अपराध लवहि नसतां, कांहो सोशील ती सती जाच ९१
॥ इ॰ आर्यावि॰ प॰ कीचकवधः॥

१ सखी. २ सखीस. ३ पूर्वसहवासामुळें

गंधर्वांनी वधिला, सिंहांनी चपळ नीच कपि साच ॥
होता मद्यप निस्त्रप, परयोषित्सक्त कीचक पिसाच १
तो आपणचि न केवळ, पावे सानुजहि पातकी नाश
देतो सकुटुंबाही, पापरता नरक पात कीनाशा २
ऐशी वार्त्ता परिसुनि, गेले दुर्योधनाकडे चर ते ॥
जे पांडव शोधार्थ, क्षितिवरि सर्वत्र नित्य संचरते ३
ते चर कथिती त्या धृत, राष्ट्रसुता पांडवप्रभावार्त्ता ॥
हे मात्र कीचकाची, तदरिहृदंबुजरविप्रभा वार्त्ता ४
कीचकनिधन परिसतां, तो पांडवशत्रु परमकर्कश तें
कोणाचें कृत्य असें, पाहे शोधुनि मनांत तर्कशतें ५
मग बोले सर्वत्र, भ्रमले निरलस स्वदास हे रानीं ॥
पांडव शोध कराया, चित्त न केलें उदास हेरानीं ६
कर्ण ते मेले कीं, गेले यागास काय बाहेर ॥
हे शोधितील असतां, नसतां करितील काय बाहेर
बोलाहो सभ्य तुह्मी, योग्य वदाया मनिप्रति ज्ञाते
हरितिल न पद प्राणहि, नेउनि सिद्धिप्रति प्रतिज्ञा ते

१ यम. २ दूत. ३ पांडवपराक्रमपीडित. ४ शत्रुहृदयकमलास सूर्यप्रभातुल्य.

रुचली युक्ति कराची, मग जरि देवें न होय शोध न हो ॥
अज्ञात वास उरला, अत्यल्पचि कीं अहो यशोधन हो ॥ ९ ॥
दूर चढोनि पडावें, ते गोमय गोलकार कीट कसे ॥ ॥
अस्खलित उच्च पदवी, प्रति लंघू पाहतात नीट कसे ॥ १० ॥
कर्ण ह्मणे प्रेषावे, ते देशा देवपे तिसमा हेर ॥
ज्यांच्या वाटे प्रभुचें, लघुहि गुरुहि कार्य मतिस माहेर ॥ ११ ॥
न दिसति ह्मणूनि केवळ, काय नसति गुर्जरीस कुचराजा
वेडाचि तो न दिसले, भूमिगतहि पांडुपुत्र कुचेरा ज्या ॥ १२ ॥
तों दुःशासन बोले, ते भोगुनियां श्रमा न वांचावें ॥
कां न मरावें व्यसनीं, ज्यां आधि महाहि मानवा चावे ॥ १३ ॥
श्री द्रोण ह्मणे शिव शिव, मरतील महानुभाव कां गा ते ॥
व्यसनीं जरि गडबडते, साधु तरी यांसि सूज्ञ कां गाते ॥ १४ ॥
रवि न टळे चिगिळा परि, उगळी खळ मलिन मंद राहु टळे ॥
गुर्वापदेंहि साधु न भी न चळे जेविं अचळ बाहु टळे ॥ १५ ॥
त्यां आधि स्तव होइल, आवडि भलत्याहि कायहो मरणीं ॥
तेशा धीरां वीरां, करणारां स्वपरकायहोम रणीं ॥ १६ ॥

---

१ राजा २ उडतुच्या ३ पृथ्वीसंचार करणाऱ्यास ४ मानस व्यथारूपमर्ग ५ ओकुनटाकी.

नपडो दृष्टि पराची, ह्मणुनि तपःसिद्धिनें स्वपदरानें॥ ॥
ते झांकिले नदिसती, पांडव गेले मरोनि न दरीनें॥१७॥
भीष्म ह्मणें या कुरुगुरुसम हित मित अन्य बोलका नाहीं
हित कामें प्राशावें, याचेंचि न अन्य बोलकानांहीं॥१८॥
जरि विश्वगुरुत्व असें, कर्तृत्वास्तव अजो तरि पुराणा॥
ज्या पुरुषा ध्यातो त्या, कृष्णासहि मत अजातरिपु राणो॥१९
जेथें तो तेथें कृत, युग धर्म समस्त तोचि वर देश॥ ॥
ऐसा तन्महिमा कीं, त्या हरिहरही प्रसन्न वरदेश॥२०॥
धर्मस्थिति तेथें कृत, युगगुण हे स्पष्ट दाविली खुण गा॥
उमगा बरें चतुर हो, तो साधु तपःसमृद्धिचा कुणगा॥२१॥
प्रासाद सद्गुणाचे, ते पांच तसीच तीसर्भा सावी॥ ॥
त्यांची भेटि अशुचि जी, दृष्टि न जालीच तीस भासावी॥२२
उघडहि निधी अभाग्या, न दिसे मलिनाजनाहि अत्रिजे गा॥
तेजस्वी का मरतिल, भीतिल ते कोपल्या हिंन त्रिजगा॥२३
अज्ञातवासपण ह्मण, उनि स्कनिपुण गुणसमुद्र तेजन हो
लावाया वेड तुह्मां, ह्मणतात प्रकट आत्मतेज न हो॥२४॥

---

१ भयानें. २ ब्रह्मदेव. ३ धर्मराजा. ४ कांतिमती ५ दत्तात्रेय॥

रूपहि ह्मणे कुरुवर्या, तन्मार्गण तों अशक्य दक्षमतें ॥ ॥
जे पाठवाल यावरि, चतुर चरप्रवेर लक्ष अक्षम तें ॥ २५ ॥
अज्ञातवास दुष्कर, परि तदवधि निपट अल्प उरला गा ॥ ॥
त्वच्छत्रूंस ह्मणेलचि, भीमाचें वज्रकल्प उर लागा ॥ २६ ॥
गांठी तुह्मासि त्यांसी, पाडीलचि वादला विरोध रणीं ॥ ॥
वाटे ह्मणालचि असकृ, सिंधूंत विरेल तरि विरोधरणी ॥ २७ ॥
शोध कराल तरि करा, सत्वर सिद्धा कराचि परि सेना ॥ ॥
गुरुसुहृदासोक्तातें, राया हितकाम कोण परिसेना ॥ २८ ॥
बोले त्रिगर्त्तराजें, प्रसन्न पांडवदशा विराटा हो ॥ ॥
प्राप्ताहि त्यजुनि ह्मणे, न शिखंडीचा परा विराटा हो ॥ २९ ॥
मेला कीचक घेता, पीडुनि बहुधा करा त्रिगर्त्तांचा ॥ ॥
[illegible]वा आह्मातेंवि, न पांथा बहुधा करा त्रिगर्त्तांचा ॥ ३० ॥
की[illegible]चकरहित विराट, स्पष्ट जसा सर्प नीरदंन दीन ॥ ॥
अल्प अनल्प बळें, तो तूं संप्रति जेविं नीरद नदीन ॥ ३१ ॥
कर्ण ह्मणें त्या मत्स्या, यासूं आह्मीतुह्मी समस्त बक ॥ ॥
बहु सुरवशोभाप्रद न, स्वरतरुचा ही यशासम स्तबक ॥ ३२ ॥

---

१ त्यांचे शोधन २ चतुरमते ३ व्रतश्रेष्ठ ४ असमर्थ ५ आगदीं ६ [illegible] ७ निर्दंत ८ समुद्र ९ गुच्छ

पांडव मेले गेले, त्यांची आता वृथा कथा राहो ॥ ॥
निर्दीप निलय जैसा, आंधारा आथिलो[1] न थारा हो ॥३३
राजा ह्मणे बहु बरें, पात्र तुह्मी या यशा सुशर्मा व्हा ॥ ॥
प्रेषी पुढें कराया, गोग्रहण खळा नृपा सुशर्मो[2] व्हा ॥३४
आपण सकर्ण सानुज, जींत गुरु द्रौणि शांतनव कृप नी
सर्वास शूरपूर्णा, सेना घेऊनियां निघे नृपति ॥३५॥
संपूर्ण पांडवांचा, तुकता अज्ञातवास सरला जों ॥ ॥
लागे विराटनगरा, तों प्रविकासोन्मुखाब्ज सरें लाजों ॥३६
सेनानी कीचकसा, जो ये चित्तास कंक राजाच्या ॥ ॥
श्रीरामाच्या तेजा, बहु मान्या रीति शंकरा ज्याच्या ॥३७
उतुकांत तो सुशर्मा, दंडाहत पन्नगोग्र हानीच ॥ ॥
व्हाया स्वकीर्त्तिची करि, धावोनि विराट गोग्रहणा नीच ॥३८
परिसे त्रिगर्त्त परिजन, गोग्रहण विराट गोपवदनांही ॥
रदनांहीं अधरातें, चावे रिपुसम असह्य गद[6] नाही ॥३० ॥
न रणा भ्याला ल्याला, क्रोधानळ तप्तकाय तो कवच ॥ ॥
प्रियही जीवित वीरा, धीरा भुलवील काय तो कवच ॥४०

१ बोलाविला. २ सुशर्म नामका. ३ विकसित कमलयुक्त सरोवर. ४ दंडताडित उग्रसर्प. ५ द[illegible]नी. ६ रोग ७ चिलखत. ८ बालवाक्ये

देउनि रथादि घेता,झाला कंकादिकांहि नवघांस ॥ ॥
ीर स्वशक्ति चतुरा, कळविति गंधेंवि जेंवि नव घांस ४१
ते गाठिले त्रिगर्त्ते, क्रमणिविरोमींच मत्स्यसेनांहीं ॥ ॥
केले भट सुभटांही, प्रबळांहीं अबळ मत्स्यसे नाहीं ॥४२
उग्र परि सुखद शिवसा,सुकवींस न वर्ण्य काय संगर तो
कींजो ह्मणे सकळजन,पावुनि सुरयुवतिकायसंग रतो ४३
करिते जाले दारुण,रण ते दोघेहि सिंहसम राजे ॥ ॥
पाहति कौतुक तेथें, उरले होते करूनि समरा जे ॥ ४४ ॥
धरिला विराट लाजे,वरि नकरी कंधरा त्रिगर्त्तांत ॥ ॥
नेणों कर्त्तव्य जसा, पडला अतिअंध रात्रि गर्त्तांत ॥ ४५ ॥
धर्मा न सोसवे जें, धरि गोरक्षणपरा सुशर्मा तें ॥ ॥
कीं सार्सकहि दुःखातें, पावे भंगें परासु शर्मातें ॥ ४६ ॥
धर्म ह्मणे भीमाहूं, हो व्यसनाब्धींत नाव गा त्यातें ॥ ॥
भलत्यातेंहि नुपेक्षी, बुध हरिचें जेविं नाव गात्यातें ॥ ४७
लक्ष्मी.
मांअन्नद आश्रयद, व्यसनीं जो केंविं तो न सेव्य जना ॥
पालक तापहरत्वें, मान जडा अन्यथा नसे व्यजना ॥ ४८ ॥

---

सूर्यासी. २ ग्रीवा. ३ विराटास. ४ सप्राण. ५ पंख्याला.

भीम ह्मणे हो त्याचा, लेखा आह्मासि कायसा राया ॥
सिद्ध समस्तहि आहों, युष्मत्कार्यार्थ काय साराया ॥ ४९ ॥
त्या भीमें द्विज तो त्वां, रक्षावा हाहि अंतकाननेंग ॥
चापचि हो पात्र यशा, दुष्टांच्या मूर्त्त अंतका न नगें ॥ ५०
ऐसें वदोनि धांवे, अरिवर गेले न राम बाण तसे ॥
साधुमनांत गुरुकथित, हरिनाम तसेंचि काम बाणतसे ५१
क्षुद्र विलंघील कसा, त्या पोरवसत्तमा कडा होतो ॥
हेमाद्रिचा न हरिसहि. लंघ्य कसा मत्त माकडा हो तो ५२
गांठी भीम जसा अहि, पति हरितां सुप्रभा वरमणीन्हा ॥
टपतो सुकीर्तिला बहुतर तेविं न सुप्रभाव रमणीला ५३
झाला भग्न सुशर्मा, हरिसी पडतांचि गांठि सिंधुरसा ॥
रस मिसळोनि स्वबळें, जिंकीसा कवण लवणसिंधुरसा ५४
अरि धरिला असतांही, असि शक्ति धनुष्य पूर्णशर भातें
खरतरहि नरवर हरिचे, करितिल समरांत काय शरभातें ५५
उग्रा त्रिगर्त्तपाळा, ज्याळा तो वीरवर सुपर्ण कुटी ॥
दे ताप तापसाला, करुनि तयाची तनू सुपर्णकुटी ॥ ५६

---

१ कथा २ शरीर ३ कृतांतमुखगत ४ वृक्ष ५ वाटतसे ६ दुर्योधनास
७ सिंहास ८ गजासारखा ९ पक्षिविशेष १० गरुड

भीमें धर्मापासीं, ओढित नेला धरूनि शांडि खळ ॥
झाला समृदु विराला, उदकीं केवळ विरे जसें डिखळ ॥ ५७ ॥
सुटला गरुडें धरिल्या, श्येनापासूनि काय तो लावा ॥
कीं शरभधृत मृगेश्वर, मुक्ते भासीच मत्स्य तो लावा ॥ ५८ ॥
भासे तो शंभुपुढें, स्मर यूपाजवळ कांपतां पशु कीं ॥
धर्मीं भूतदयेस्तव, उठले जेसेचि कांप ताप शुकीं ॥ ५९ ॥
भीम ह्मणे उघड दिसे, हेंचि खरें काय जी बरा नातें ॥
धर्म ह्मणे हा याचक, तूं दाता कायजीव दानातें ॥ ६० ॥
जोंवरि नसे कवळिला, तोंवरि मंडूक दापितो भुजंगा ॥
जो स्पर्शिला रणीं त्वा, न धरी कंडू कदापि तो भुज गा ॥ ६१ ॥
हा वीरश्रीस कर, स्थित अनुचित भारतीस वापससा ॥
सोड बधावा सिंहे, केला अपराध ह्मणुनि काय ससा ॥ ६२ ॥
भीम ह्मणे मी तुमचा, दास असें स्पष्ट बोल पापा हूं ॥
धर्म ह्मणे जाऊंदे, शंके मी या धृतत्रपा पाहूं ॥ ६३ ॥
नमन पुरेरे जारे, ध्यान्या गान्या दिसोत गाई शा ॥
शिचमूर्ति किरे यांचें, लंघन सोसेल काय गा ईशा ॥ ६४ ॥

---

१ इभ ह्मणजे गज २ विराट—मत्स्या ३ यज्ञस्तंभ ४ सर्प ५ निर्लज्ज ६ ईश्वरास

अभय दिल्हें परि कादी, नमुनि विराटा निकाम[1] नीच पळे
बोधीं बाहेर निका, होय परि नव्हे निका मनीं चपळ ॥६५॥
यत्ना सोडवूनि वसविति, पावुनि विजयोत्सवा रणांजिर[3]तें
अभिमान हरिसि[4] ज्याचा, केंसें तद्रूस्क वारणा[5] जिरतें ६६
पांडुसुतांतें पूजुनि, मत्स्यपति ह्मणे दिली तुह्मा महिम्या
हे काय प्रत्युपकृति, गाइन तुमच्याचि नित्य या महिम्या ६७
कंका हो राजा हे, बल्लवमुख[6] सचिव[7]राय होऊत ॥
तुमचें यश शुचि याहुनि, दुग्धाचा अधिक काय होऊत ६८
हे क्षिति किति योग्य तुह्मी, भोगाया सार्वभौमपदवीतें ॥
ऐशा सुयशास्तीर्था, ज्या तुमचें सत्व विष्णुपदवीतें ॥६९॥
कंक ह्मणे आह्माला, राज्यादिक सर्व पावले नृपते ॥
ज्यां करद स्वबल नीजे, त्यांचीं नमिताति पावलें नृप ते ७०
स्वाश्रयभजन स्वभजन, न परार्थ स्वार्थयत्न हा राया ॥
त्या आपुल्याचि केली, सत्कृति चिंतारत्नरत्न हाराया ७१
आधीं निज विजयपुरीं, चार प्रेषूनि शीघ्र कळवावा ॥
नरसिंहा क्षिप्र सुहृद्धृद[8]यसरोगाधिनाग पळवावा ७२

---

१ यथेष्ट २ शुद्ध ३ रणांगण ४ सिंहास-ईश्वरास ५ गजास.
६ बल्लवप्रमुख ७ प्रधान ८ मित्रहृदयतडागप्राप्त मनोव्यथारूप गज

राय ह्मणे चरहो जा, चिंतातेटिर्नांत तें न पुर वाहो ॥
सांगोनि विजय निजजन, कर्णसुधापानकाम पुरवाहो ७३
नगर अलंकृत करवा, अमरीकृतपुष्पवृष्टिला ज्यांची ॥
शोभा विपेक्ष ऐसी, स्त्रीनिकराकरुन वृष्टि लाइयांची ७४
कथिलें पुरासि धांवत, जाउनि तें विजयवृत्त हेरजनीं ॥
पुरजन ह्मणती चिंता, सरली परि कसि सरेल हे रजनी ७५

॥ श्रीमदार्याभा·वि·प·दक्षिणगोग्रहन ॥

मत्स्यपुरोत्तरभागीं, प्रातःकाळींच ये सुयोधन हो ॥
त्यासि जयप्राप्ति मनीं, ह्मणती भीष्मादिही सुयोधनेहो
सहसा व्रजांत गाठुनि, बहु ताडुनि करुनि बद्धभुज गवळी
षष्टिसहस्र सुगोधन, तो कुरुकुळचंदनद्रुभुजग वळी २
गोपाध्यक्ष रथावरि, बैसुनि धांवे नृपासि सांगाया ॥
चित्तीं ह्मणे बुडाया, कुर्वधमा हरिसि धेनु कां गा या ३
तो राजगृहीं जाउनि, रायाच्या उत्तराख्य तनयातें ॥
नमुनि ह्मणे हो नेतो, दुर्योधन धेनु करुनि अनयातें ४
गोधन षष्टिसहस्र, व्रज ओस करूनि नेतसे कुटिल ॥

१ चिंतानदीत २ सदृश ३ लाह्यांची ४ दूतमंडळीने ५ न होवो.
६ कपटी

लुटिल प्रजाहि जो गो,¹पीडक तो ब्राह्मणा न कां कुटिल ॥५॥

कवची धन्वी खड्गी, व्हा चित्तीं रामचंद्र हि असा ध्या॥ ॥
बैसा रथीं जयश्री, गोविप्रावनपरांसि न असाध्या॥६॥ ॥

उत्तर ह्मणे असें जरि. मी एकाकी लहान परि सर्वतें॥ ॥
यश जोडितोंचि असता, सारथि तरि कथन मज न परिसेवतें²॥७॥

होता परम निपुण परि. त्या ख्यात रणांत सारथि गव्हाला ॥
झांको छिद्र भलतसा. अडले ह्मणतात सार थिगळाला॥८॥

कर्णादिकांसि देता. समरीं वैराटिकेसरी करिता ॥ ॥
जिष्णु पुढें असुरजनीं, कोण्ही वैराटिके सॅरी करितां॥९॥ ॥

मिळवा कोण्हीतरि हो, धैर्याचा मात्र उदधि सारथि जो॥ ॥
कुरुभटसमूह पाहुनि, मज जेंवि हिमोसि सुदधि सार थिजो॥१०॥

ऐसें बहुतचि बोले, तो बालिश बोल बायकां माजी॥ ॥
चित्रपटकटकसें शिशु, भाषण येईल काय कामा जीं॥११॥

तें परिसुनि येकांतीं, पार्थ ह्मणे देवि कृष्णासखि जावें॥ ॥
उत्तरसारथि होउनि, म्यां त्वां मजवरि कदापि न खिजावें॥१२॥

कृष्णा ह्मणे बहु बरें, व्हा मारुत हो पलाल खळबळ तें॥ ॥

---

१ वेगळें २ न ऐकवतें ३ गजपणा ४ इंद्रापुढें ५ बरोबरी ६ थंडीस ७ नूप
८ चित्रांतील सैन्यासारखें ९ स्त्री १० वायू ११ पाचोळा.

मद्हृदय न अरिसैन्यें, तुमच्या दैन्येंचि फार खळबळतें॥ १३॥ ॥
त्या उत्तरासि सांगे, सारथ्य बृहन्नडा करिल यातें॥ ॥
सूत करुनि विजयानें, नेले बहु खांडवीं अरि लयातें॥ १४॥ ॥
सारथ्य गीत नृत्य, प्राप्तीचा हेतु जिष्णुसहवास॥ ॥
पूर्णत्वाचा लागे, पशुपां भ्रमतांहि विष्णुसह वास॥ १५॥ ॥
भगिनीमुखेंचि विनवा, तन्मतिला उत्तराचि वळवील॥ ॥
अतिसहवासि वच मना, कर्तक कलुषिता वनां निवळवील १६
उत्तर ह्मणे कुरुकटक, न पभूंस यशासहि स्वसे नेनें॥ ॥
अवकाश पळहि नाहीं, कळवाया वृत्त हें स्वसेनेनें॥ १७॥ ॥
माझें सारथ्य करो, तुझिया वचनें बृहन्नडा गमला॥ ॥
हाचि सदुपाय वत्से, लागो अपकीर्तिचा न डाग मला॥ १८॥ ॥
ती धावत जाय ह्मणे, गानादिक हें बृहन्नडे राहो॥ ॥
समयीं सारथ्य गुणा, उघडूनि कंदर्पचा न डेरा हो॥ १९॥ ॥
गोधन षष्टिसहस्र, स्वपुरा नेताति हरुनि कौरव हो॥ ॥
गौरव हो न बुधजनीं, त्या मेल्यानां अनंत रौरव हो॥ २०॥ ॥
त्यांवरि जातो उत्तर, त्याचें सारथ्य ये करायास॥ ॥

---

१ सारथी २ अर्जुनसहवास ३ गोपाळास ४ भिववीची वी... ५ कास ६ हे-भगिनी ७ स्वराचा.

सुखद इहामुत्रहि गो, विप्रत्राणोत्थ जयकरा १ यास ॥२१॥ ॥
देता जाला पूर्वी, तुज निजसारथ्य सव्यसाची हो ॥
सेरंध्रीची वाणी, व्हाया गोवत्सभव्य सांची हो ॥२२॥ ॥
उठल्या उत्साहाच्या, त्या शांतश्रीमदुदधिवरि लहरी ॥ ॥
धरितां हनु ननु ह्मणतां, भक्ताचें कां न सुदेधि वरिल हरी २३
देवातें भक्ति तसी, पार्था तेजें करूनियां वश हो ॥ ॥
त्याच्याहि मनीं होतें, कीं विश्वामाजि आपुलें यश हो ॥२४ ॥
उत्तर ह्मणे बहु बरें, देउनि वचनास मान आलीस ॥ ॥
बोले बृहन्नडा स्मित, पूर्वक विटवील कोण आलीस ॥२५ ॥
वाद्य असो नृत्य असो, हो अभिनय किमपि गान अथवा हो ॥
जाणोनि कसें ह्मणतां, समरांत बृहन्नडाचि रथ वाहो ॥२६ ॥
वैराटि ह्मणे नर्तन हो, कीं वादन तथैव गायन हो ॥ ॥
सारथि हो या समयीं, येकहि वश कौरवांसि गाय न हो २७
ऐसें वदे कवच दे, त्या श्रितकुशलावहास त्यायाला ॥ ॥
तद्धारणीं चुके तो, कन्या पाहोनि हांसल्या याला ॥२८॥ ॥
ज्याचें किरात रूपी, प्रभुधिक्कृतिगर्भ गाय नाक वच ॥ ॥

१ अर्जुन २ गोवत्सकल्याण ३ खरी ४ शांतिसमुद्रअसाअर्जुनावर ५ उत्त
मदधि ६ सत्वास ७ स्वर्ग.

हासे आपणहि ह्मणे, ठावें मज काय गायना कवच ॥२९॥ ॥
लेवविलें राजसुतें, जाणों त्याला कधीं न तो कवच ॥ ॥
सच्चरित अप्रगल्भहि, हृदयहर जसें स्वधान तोकवच ॥३०
होउनि सिद्ध रथावरि, चढतांचि सहोत्तरा तिच्या आली ॥
ह्मणती बृहन्नडे तुज, वीरश्री गौरवावया आली ॥३१॥ ॥
दिव्य रुचिर वस्त्रांतें, आण करायासि बाहुल्या कटकें ॥ ॥
जिंकुनि अरिचीं तुह्मीं, बहु शोभाया स्वबाहुल्या कटकें ३२
उत्तर आणिल जें तें, निर्भीया तुज सुबाहुल्या लागे ॥ ॥
मज कवच लेवबुनि हा. आपणचि पाहा सुबाहु त्याला गे ३३
ऐसें बोलुनि हाकी, उत्तररथरत्न कृष्णासारथि तें ॥ ॥
सांगे स्वदास्य मिहा, हरवाया तेज कृष्णासारथितें ॥३४॥ ॥
ह्मणती स्त्रिया प्रयाणीं, तुजला मंगळ बृहन्नडे हो तें ॥ ॥
जें खांडववनदाहीं, नरसारथ्यांत जाहलें होतें ॥३५॥ ॥
द्विज ह्मणती या यशस्वी, होउनि जयदायि आज्यजिर तें हो ॥
खलबळ मदाग्निजनीं, दहनीं पुकळहि आज्य जिरतें हो ॥३६
सत्वर बृहन्नडा नृप, सुतरथ नेऊनि जाय बाहेर ॥ ॥

---

१ बालवाक्य २ सखी ३ सैन्यें ४ कडीं ५ दक्षिणदिशा ६ रणांगण.

त्यासि ह्मणे प्रहरावें, ह्मणसी कुरुकटक काय बाहिर ॥ ३७ ॥ ॥
आपण चित्तांत ह्मणे, मेळवितों आजि नीच हो यश मी ॥ ॥
शिवमूर्तिसी श्मशानीं. अस्मज्जय हेतु तीच होय शमी ॥ ३८ ॥ ॥
कुरुकटकासि पहातां, तो उत्तर बाळ फार गडबडला ॥ ॥
स्वपरबळाबळ नेणुनि, बालिश बहु बायकांत बडबडला ॥ ३९ ॥ ॥
बोले बृहन्नडे हें. कुरुबळ कल्पांतसिंधुसें गमतें ॥ ॥
ने रथ पुरांत मागें, मन्नयनहि पाहतां बहु भ्रमतें ॥ ४० ॥ ॥
दुर्योधन दुःशासन, कर्ण कृप द्रोणि भीष्म ज्या कटकीं ॥ ॥
त्यांत मरेनचि शिरतां, कांट्यांवरि घालितां चिरे पटकीं ॥ ४१ ॥
एकाकी मी रिपु बहु, ऐशाची कीर्ति काय हो मरणीं ॥ ॥
पश्वर्थे केवि करूं, सर्वपुमर्थद सुकाय होम रणीं ॥ ४२ ॥ ॥
आज्ञा नसतां आलों, रागे न भरेल काय हो तात ॥ ॥
रोमांच घर्म कंप, प्रगट व्यापूनि कार्य होतात ॥ ४३ ॥ ॥
पार्थ ह्मणे राजसुता, आतां वदतोसि हें अहा काय ॥ ॥
शय्येवरि न पडाया, योग्य रणक्षितिवरीच हा काय ॥ ४४ ॥ ॥
तेव्हां स्त्रियांत तैसें, बोलुनि आतां असें कसें वदसी ॥ ॥
एकहि बाण न सुटला, नाहीं अद्यापि झळकला सदसी ॥ ४५ ॥ ॥

---

१ पाहा २ मै ग. न ३ सर्वपुरुषार्थ. यक असा सुंदरदेहाचा होम ४ देह ५ उत्तमनरवार

गोमुत्स्पर्श न शिरतो, धैर्ये या वीरनायकानींकीं ॥ ॥
करिजेल हास्य आस्ये, पेक्षनि नगरांत बायकानीं कीं ॥ ४६ ॥ ॥
देउन सारथ्य मला, घेउनि आलासि काय उत्साहें ॥ ॥
नेणासि काय पलायन, करितां लोकांत होय कुत्सा हें ॥ ४७ ॥ ॥
निर्जनवृत्तिरसीं लोभी, हो साधो बुद्धि अन्यथा न करी ॥ ॥
निजहितलोभें धरितो, शिशुहि मुखीं एक अन्यथा न करी ॥ ४८ ॥
सैरंध्रीनें कथिलें, माझें सारथ्यनिपुणपण साचें ॥ ॥
टाकिति न बाल्यरंगें, फळ नीरस ह्मणुनि निपुण पणसाचें ॥ ४९
मी भांडेन स्थिर हो. तुजहि मजहि आजि आजि न परतणें ॥ ॥
हरितील न गाईतें, भीतिल करितील आजि न परतणें ॥ ५० ॥
मरतीच न दाखविती, पावुलहि पळोनि तोंड लेक विल्या ॥
ह्मणती सद्यः कीर्ति, प्रज्ञाग्रस्पर्शी तोंडलें कविल्या ॥ ५१ ॥ ॥
कज्जलसें करूं कसें. सैरंध्रीकृत दुधासम स्तवन ॥ ॥
सन्मन अनृता भीतें, जेविं कुठारायुधा समस्त वन ॥ ५२ ॥
तों या मुखीं न येतां, यावी सुयशेंकरूनि सुखमा जी ॥ ॥
दावाया सैरंध्री, प्रति हें मति वरिल केविं मुख माजी ॥ ५३ ॥

---

१ वीरश्रेष्ठांच्या मेन्यांत. २ मुख. ३ निंदा. ४ शौर्यरुआविषयीं. ५ ऋतुरूपतृण. ६ आ
भास. ७ कालिमा ८ सुषमा ह्म० शोभा. ९ तुच्छ.

चाल उगाचि अपयशें, न तुझें मुखचंद्रमंडळ मळावें ॥ ॥
होतों बळाब्धिपारद, पोरद तुळ्य न तुचा डळमळावें ॥ ५४ ॥ ॥
ऐसें पार्थ वदे तों, भिऊनि कटकबागुलासि पोर पळे ॥ ॥
शत्रुप्रतापदाव [वणवा] ज्वाळांनीं तो कुरंग होरपळे ॥ ५५ ॥ ॥
पार्थ ह्मणे प्रभुपाशीं, वर हा दे हेंचि याचितो उमेरा ॥ ॥
बोलेल बहु निरर्थक, तो स्वजनीं दाविताचि तोंड मरो ॥ ५६ ॥
त्यासहि ह्मणे अरे रथ, गिरिशिखरच्युत महोपळ [पाषाण] उभारे ॥ ॥
आल्या तुला वराया, कीर्ति पराङ्मुख नको पळ [illegible] ॥ ५७ ॥
हरिनीळहार कृष्णा, व्याळ नव्हे स्वभ्रमें पळवि लास ॥ ॥
वरितां अकीर्ति न रुचे, रंभेसा हरिसिंही पळ विलास ॥ ५[illegible]
तो किमपि न दे उत्तर, उत्तर उत्तरदिशेसि सोडूनी ॥ ॥
जाय पळत दक्षिण दिशिं, तो नगराप्रति अकीर्ति जोडूनी ५९
जाय पुराप्रति जोडा, अपकीर्ति सुकीर्ति हातिची दवडी ॥ ॥
मातेप्रति पोर जसें, मुद्रा हरवूनि मेळवी कवडी ॥ ६० ॥ ॥
धावे पार्थ धराया, कीं त्यासहि अपयशीं न मज्जन हो ॥ ॥
उपदेशी भगवान् कीं, असि मज्जनरीति हा नमज्जन हो ॥ ६१ ॥

---

१ पाण्या मारखें २ वाद्यविशेष. ३ इंद्रनील मण्यांचा हार ४ कृष्णसर्प ५ [illegible]
६ [illegible]

सकळा सकळा विद्या, श्रुतमात्र जयाभि राहिली पाठ॥ ॥
अश्निा कुसंगतीस्तव, त्या तेंशाचीहि पाहिली पाठ॥६२॥ ॥
वाटे पुढें पळे तो, स्त्रीसंगविरक्तधी कुमार मणी॥ ॥
पुत्रस्नेहें धावे, त्यामागें शंभुची उमा रमणी॥६३॥ ॥
किति हांसले विलोकुनि, झाले किति चकित वहुनेय शास्त्री
कीं वांछील भगवती, हुनि अन्या करुनि युद्ध न यश स्त्री ६४
कौरव ह्मणति नव्हे स्त्री, व्यक्त स्त्रीवेष पुरुष तर्कशतें॥ ॥
मृदुलप्रकृति स्त्रीवपु, एवंविध धावनीं न कर्कश तें॥६५॥ ॥
श्रीकृष्ण अर्जुनाचें, बाहु परिघसे तसेचि कीं शिर तें॥ ॥
पद रंभिक सम परि रसिक, मन काय पर्यां तसेचि कीं शिरतें ६६
हा क्लीबहि सम वेषें, क्लीबीं ऐसें परंतु तेज नसे॥ ॥
धाटति देखावेसे, काय पुरुषवेष पंढ ते जनसे॥६७ ॥
काल त्रिगर्तपतिनें, गोग्रह केला ह्मणोनि प्रतनेला॥ ॥
घेउनि विराट गेला, बहुधा तो पितृवनीं न मृत नेला॥६८ ॥
नसुन उत्तर होता, नगरीं तो परिसतांचि गोहरणा॥ ॥
पार्थासि करुनि सारथि, आला जो बाळ सुलभमोह रणा॥६९

---

१ कलासहित. २ कार्तिकस्वामी ३ नीतिमंत ४ अरण्य, मागरवे ५, कर्दादाचीक ६ सु शर्म्यानें ७ मनम.

हरिण जसा सिंव्हाला, सेनेस पाहतांचि तो भ्याला ॥ ॥
सुयशाहुनि जीवित बहु, वाव्हाला जेंवि वित्त लोभ्याला ॥७०
कातर रथी पळाला, तो अयशस्सागरीं तरायाला ॥ ॥
मानी अर्जुन सारथि, त्यामागें धावला धरायाला ॥७१॥ ॥
वदनि असें कुरु जों तों, पदगत धावोनि कुंतेयीं धरिला ॥ ॥
जाणों अपकीर्तिनदी, पतित शिशु बळेंकरूनि उद्धरिला ॥७२॥ ॥
त्वमनीं पार्थ ह्मणे रे, जरि विहित रडेनि मानितोस रड ॥ ॥
मी प्रभु हें अज्ञपदीं, कुशीं बैसूनि मानितो सरड ॥७३॥ ॥
उत्तर ह्मणे नकोरे, पायां पडतों बृहन्नडे सोड ॥ ॥
सोड दिली दुखउं नको, केवळ पितृकरतळस्थ हा फोड ॥७४
जों जों वैराटि रडे, तों तों तो पार्थ सदय परि साचा ॥ ॥
खळसा हांसे तोहा, निंद्य नव्हे ग्रावभाव परिसाचा ॥७५॥
दाटूनि हित कराया, नळकेशांतें धरूनि आकर्षी ॥ ॥
बसवी रथीं बळें हरि, भजनीं मंदासि जेंवि नाकर्षी ॥७६॥ ॥
कुरबाळूनि ह्मणे गा, राजसुता योग्य तूं न कांपाला ॥ ॥
मृदुलत्व म्लानत्व, स्वीकारूनि जाहलासि कां पाला ॥७७॥ ॥

---

१ भित्रा २ केश ३ खरा ४ दृशामारखा ५ दगडपणा ६ आस्त्यास ७ नारद

तुज उत्साह नसे तरि, करितों घेउनि धनूस मी रणहो ॥
मज मेघासि कराया, शरवृष्टि सहाय तूं समीरण हो॥७८॥
घे रश्मि करीं सारथि, हो हूं चालीव आजि हो वाजी॥ ॥
मी मथितों कुरुपृतना, करितें क्षुब्धाब्धिसी हि हेवा जी७९.
जाय शमीप्रति किंचित्, स्वस्थासि रथीं बळेंचि वाहूनी॥ ॥
आलिंगाया समर.प्रियसख गांडीव चाप बाहूनीं॥८०॥ ॥
द्रोण म्हणे कौरव हो, काय पहातां रथावरुडेचि रहा॥ ॥
अद्भुत अश्वाश्रुध्वज,कंपाद्युत्पातही पहा चिर हा॥८१॥ ॥
परिसा बरें शिवांचें. रुदित अशुभसें असुस्वर क्षण हा ॥
व्यूह रचा हो रक्षा. गोधन हें यश असुस्वरक्षण हो॥८२॥।
न बुडे बळें बुडवितां. उसळेचि जळीं जसा अलांबु बुडा॥ ॥
दिसतो नसाचि जपतो, स्वयश न जपे तसा भला बुबुळा ८३
गया भीष्मा सकृदपि, या नयनीं पाहवेल न क्लीबा॥ ॥
बहुरूप अर्द्धनारीश्वरसा तद्भक्त हाहि नक्ली बा॥८४॥ ॥
आइकतों कीं हा कृश. केवळ होता तपें परि भवानें॥ ॥
झाला बहुमत समरीं, करिल परांच्या न कां परिभवातें॥८५॥

---

१ जलवृष्टि- बाणवृष्टि २ वायु ३ कौरवसेना ४ कोल्ह्यांचें ५ कठोर ६ प्राणधनरक्षण ७ भोपळा ८ शिवानें.

अस्मत्परिभव करितो, आजि नभातें शरव्रजें भरितो॥ ॥
गोधन हरितो वरितो, कीर्ति अशनिभृदरिकेरिकटा हरि तो॥८६॥
कर्ण ह्मणे गुरुगुरुजी, स्तवितां मज यूथपतिपुढें कलभा॥ ॥
ह्मणतां शकलीं बहु रवि,कांतगिरि परिस रवीपरिस बल भा॥८७॥
भूप ह्मणे कर्णा हा, जरि अर्जुन देव पावला नवसा॥ ॥
जाइल पुन्हा वनाला, बंधुसह अरण्यवासि मानवसा॥८८॥
अथवा असेल दिसतो, तैसा तरि पार्थमनें बुद्ध्या लाजो॥ ॥
मर्कट तुरेंचि शोभे, हनुमत्पाणिस्थिता गुळाला जो॥८९॥ ॥
जाउनि शमीनिकट तो, विजय ह्मणे स्वस्थ तू कुमारा हो॥ ॥
पाहुनि मत्कृत खळबळमथन चकित भगवती उमा राहो॥९०॥
मद्भुजबळानिळें हे, ध्वस्त अहित कटक अभ्र सार हो॥ ॥
परि हीं तुझीं धनुष्यें, क्षणहि न टिकतील दभ्रसारें हो॥९१॥
आहेत पांडवांचीं, दिव्यास्त्रें या शमिद्रुमीं उतरीं॥ ॥
पाहुनि पळोत त्या हरि,नरवरांतें सर्व खळबळें कुतरीं॥९२॥
उत्तर ह्मणे शमीवरि, शव आहे ऐकिलें न शिववेची॥ ॥
सांगसि असें कसें गे, कुणपाचा स्पर्श सर्व शिव वेची॥९३॥

---

१ इंद्रशत्रुगजगंडस्थळास २ सिंह ३ गजाधिपापुढें ४ गजबाळास ५ सूर्यकांतपर्वतापेक्षा ६ कांति ७ अल्पबळ ८ कल्याण.

पार्थ ह्मणे कैंचें शव, ठकवुन बुडवील कायहो यश मी॥ ॥
त्या शस्त्रांला असतां, शव आश्रययोग्य काय होय शमी ९४
वृक्षीं वेष्टन सोडुनि, नमुनि ह्मणे रक्ष आयुधग्रामा॥ ॥
आलों शरण तुला मी. लोक जसा रक्षआयुधग्रामा॥९५॥ ॥
जाणों सच्छस्त्रेंहो, स्वाश्रय पांडवजयार्थ सुतपानें॥ ॥
करितां छाया सघना. लोकत्रितयांत अंधसुतपानें॥९६॥ ॥
वैराटि चापखड्गा,घासुर्धचिन्हें समस्त वाखाणी॥ ॥
भवभीतिस कारि ज्यांच्या. करुनि हरिस्तवसम त्यवा रवाण्या॥९७
वर्णुनि शस्त्रांसि पुसे, कवणाचें कवण यांत सांग मला॥ ॥
त्या पांडवांसि यांचा. व्यसनांत त्याग योग्य कां गमला॥९८
पार्थ ह्मणे वैराटे. ज्यावरि शतकनकबिंदु पाहसि तें॥ ॥
गांडीव यश जोडी, जेवि विधुहूनि कीर्तिवाह सितें॥९९॥ ॥
ब्रह्मा धरिता झाला, गांडीवातें सहस्र मित वर्षें॥ ॥
(१५३)
धरिलें प्रजापतीनें, ज्युत्तर पंचाशदब्दशत हर्षें॥ ॥१००॥
(८५)
मग पंचाशीति समा. शक्रें सोमेंहि पंचशत अब्द॥ ॥
वरुणें शत संवत्सर, याणें लागं दिन्हा न दुःशब्द॥१०१॥ ॥

---

१ शस्त्र सचना २ शस्त्रमानें आयुष्यदहनकरणाऱ्या गमास ३ उत्तमतप ५ धृतराष्ट्रपु
त्रपराक्रम नि ६ शस्त्र ९ वर्षें

आहे पार्थापासीं, सार्द्धद्वात्रिंशदब्द हें चाप॥ ॥ ॥
राहे चरमापत्याजवळी प्रेमार्द्रधी जसा बाप॥१०२॥ ॥
जें इंद्रगोपचित्रित, तें धर्माचें धनुष्य जाणावें॥ ॥ ॥
ज्यावरि कांचनवारण, तें भीमाचें मनांत आणावें॥३॥ ॥
धरिजे तें त्र्यर्कांकित, कार्मुक नकुळें समस्तयोधनुतें॥ ॥
सौवर्णशलभज्यावरि, सहदेवाचेंचि होय हो धनु तें॥४॥ ॥
सांगे असेंचि वर्णुनि, गुण तूण कृपाण बाण जाणाया॥ ॥
तें गांडीवाद्यायुध, उतरुनियां आपुलेंचि आणाया॥५॥ ॥
कोठें बृहन्नडे ते, ज्यांचे गुण हर्ष नित्य नव देता॥ ॥
कोठें देवी जिव्हा, भस्म असें त्या खळांसि न वदे ता॥६॥ ॥
पार्थ ह्मणे वैराटे, जो अर्जुन तोचि मी असें जाण॥ ॥
जो कंक तोचि राजा धर्म नव्हे अनृत हें तुझी आण॥७॥ ॥
बल्लव भीम ग्रंथिक, तोचि नकुळ तंतिपाळ सहदेव॥ ॥
सैरंध्री ती जीचा, कैवारी वृष्णि मूर्त्त मह देव॥८॥ ॥
वैराटि ह्मणे ज्यांतें, जाणांत जपतीहि पूज्यपाद शमी॥ ॥
सांग वरें जाणनसें, नामें त्या शक्रसूनुचीं दश मी॥९॥ ॥

---

१ मृगकीटकविशेष. २ सर्वयोध्यानीं स्तुत. ३ सुवर्णपतंग ४ यादव. ५ अर्जुनाचीं

सांगे अर्जुन फाल्गुन, जिष्णु किरीटी असीं दहा नावें॥ ॥
त्यांची निरुक्तिहि करी, कीं तेणें सर्व सत्य मानावें॥ ११०॥ ॥
दशनामनिरुक्तीप्रति, परिसुनि पार्थासि तो करी नमन॥ ॥
प्रार्थूनि ह्मणे समरीं, सारथि होउनि सुखी करीन मन॥ ११॥ ॥
घेऊनि आयुधांतें, उत्तर उतरे परंतु संदेह॥ ॥
उठला जेंवि रविपुढें, उठती उदयींच दैत्य मंदेह॥ १२॥ ॥
सत्यचि अर्जुन जरि तूं, कां क्लीव क्लीबवेष कां धरिला॥ ॥
पार्थ ह्मणे गुर्वाज्ञा, ह्मणुनि व्रत वर्ष एक आदरिला॥ १३॥ ॥
बैस रथीं तूं माझा, सारथि हो तरणिचा जसा अरुण॥ ॥
न्यावा चमूवरि तुवां, रथ तरुणीप्रति जसा स्मरें तरुण॥ १४॥
आतां सोडवितों पशु, खळबळ पळ न लगतांचि पळवीतों॥ ॥
श्री विजय असें तुजविण, सकळांही कौरवांसि कळवीतों॥ १५॥
धृतरश्मि कुमार ह्मणे, दारुक कीं आजि मातली लाजो॥ ॥
दंड करावा या कुरुसेनेला योग्य मातलीला जो॥ १६॥ ॥
काढूनि शंखवलयें, त्याला पुंभूषणें सितें वस्त्रें॥ ॥
बांधूनि केश माथा, गड्मुख होऊनि आठवी अस्त्रें॥ १७॥ ॥

---

१ अन्वर्थता २ सूर्याचा ३ कृष्णसारथि ४ इंद्रसारथि ५ पूर्वाभिमुख.

तों तो नदृष्टिपथीं, गोचर होवूनि करूनियां प्रणता ॥ ॥
आज्ञा स्वकिंकराला, आज्ञा काय प्रभो असें ह्मणता ॥१८॥ ॥
त्यांसि नमुनि जिष्णु ह्मणे, या या ह्रदयीं रहा असें न रहा ॥
आधीं वीररसीं मग, बुडवावा सद्यशोरसीं नर हा ॥१९॥ ॥
शिरतो अस्त्रें चित्तीं, निजतेजें भानुला मनीं करवी ॥
चरवी गुण गांडीवीं, तन्नादें कंप महिसेही परवी ॥१२०॥ ॥
उत्तर ह्मणे खरा तूं, नाहीं फाल्गुनाच कीं परि सहाय ॥
ह्मणतों मनांत पार्था, बहुधनसार्थाधिपा परिसे हाय ॥२१॥ ॥
हासुनि जिष्णु ह्मणे गा, तुजला असहाय पार्थ कां गमला। ॥
आहे प्रसाद गुरुचा, कोण अधिक यापरीस मांग तला ॥२२॥ ॥
मागें युद्ध केलों, ह्मणवूनि जनांत घेतलें धन्य ॥
तेव्हां गुरुप्रसादाहूनि मज सहाय कोण तो अन्य ॥२३॥ ॥
असतां द्रोण सुरेश्वर, हरिहर हे गुरु समर्थ असहाय। ॥
एकाकी पार्थ कसा, न ह्मणावें त्यजुनि वीररस हाय ॥२४॥ ॥

इत्यार्याभार० विरा० उत्तरगोग्रह अध्यायः समाप्तः ॥५॥ ॥५॥

---

१ रज्जु २ भूपीस ३ ऐक ४ इंद्र.

स्मरतांचि वानरांकध्वज गगनांतूनि उतरला महि[1]ला॥ ॥
तो स्थापला रथीं त्या. श्रीकृष्णासखें शर्मानचीं पहिला॥१॥
जातां कुरुकटकावरि, वाजविला दिव्य देवदत्त दरें॥ ॥
तो होय जनां जैसा, कल्पांतीं रुद्रदेवदत्त दर॥२॥ ॥
झाला उत्तर त्यातें, जिष्णु ह्मणे पावलासि कांप दरें॥ ॥
अद्यापि वांधिलेंसे, तुझिया मतिनें अधैर्य कां पदरें॥३॥ ॥
तो वैराटि ह्मणे गा, कोणाचाही असा न द[2]र वाजे॥ ॥
या लागले असावे, अमरपुरींचेहि आजि दरवाजे॥४॥ ॥
ते गजदिग्गज झाले, वहुधा धैर्यावसानदरवाजे॥ ॥
वारे श्रीनृपवाहन, विभुनाहि रणीं असा न दर वाजे॥५॥ ॥
झाली वहुधा विद्युत, कांपतसे यान्नियाचि निःस्वानें॥ ॥
मी किति ज्याला भी श्री. त्याला झावें कसें न निःस्वानें॥६॥
अर्जुन तुह्मीच कळलें, ठेऊं द्या दरें न मानसा दरे हो॥ ॥
रक्षा धृति आहें मी, सूतपणां हरिसमान सादर हो॥७॥ ॥
हांसोनि ह्मणे हरिसख, हो गाढासन विकंपथा धीट॥ ॥
न धरी या दरें हा दर, सादर दे वाजवूं पुन्हा नीट॥८॥ ॥

१ भूमीवर २ शंख ३ भय ४ शब्दाने ५ दारिद्राने ६ क्रान्ति ७ स्थिरबुद्धि.

ऐसें वदे करी मुदु, पूर्वे जलजवादनीं[+] मग जवा[1] जी॥ ॥
तेव्हां त्या कुरुकटकीं, हगले मुतले समस्त गज वाजी॥९॥ ॥
द्रोण ह्मणे न दिसे जय, कां करितां आनेनें नत पाहारे॥ ॥
आला विजय जयाचें, श्रीशंभुतपापुढें न तप हारे॥१०॥ ॥
गांधार ह्मणे गुरुजी, पण न करुनि पूर्ण हा प्रगटला हो॥ ॥
पुनरपि वनवास करो, गुरुघातक पातक प्रगट लाहो॥११ ॥
कर्णाद्यांप्रांसि ह्मणे, तुमचे विजयी असोत हात रणीं॥ ॥
शरपटलच्छादित हो, सार्जुनशस्त्रप्रताप हा तरणी॥१२॥ ॥
गुरुजीस काय पुसतां, चापीं गुणे मदृच्चेंचि चढवा हो॥ ॥
याला हेंचि ह्मणावें, कीं आह्मा धर्मशास्त्र पढवा हो॥१३॥ ॥
प्रियशिष्य धनंजय गुण, वर्णुनियां यांसि त्हृदय निवबूंद्या॥ ॥
उत्पातोत्प्रेक्षेनें, जरि आह्मा भिवविताल भिववूं द्या॥१४॥ ॥
पढवावें मात्र इहीं, भेदावें परत्हृदज्ञ कटुकेंवच्नें॥ ॥
कीं दुरुनि दिसावे हे, प्रेक्षकदृष्टीस युद्धपटु कवचें॥१५॥ ॥
प्रार्थुनि पुढें करावे, हे यज्ञीं कीं सुभोजनावसरीं॥ ॥
सिंधुत तरेल कैसा, जो केला केलिहेतु नाव सरीं॥१६॥ ॥

---

+ शंखवाद्यीं १ वेगा २ मुखें ३ दुर्योधन ४ सूर्य ५ रज्जु ६ कटुभाषणानीं ७ युद्धकुशल ८ क्रीडार्थनौका. ९ सरोवरीं.

खळकृतगुरुनिंदेतें. वर्णील कधीं न विस्तरें सुकवी ॥ ॥
कीं ती श्रीगुरुभक्ति.प्रेमामरपादपांकुरा सुकवी ॥१७॥ . ॥
कर्ण ह्मणे सत्य वदसि. परि आधि तुझ्या नसो मनीं कांहीं ॥ ॥
यद्यपि समरोत्साह, त्यजिला अर्जुनभयें अनीकांहीं ॥१८॥ ॥
जातूत गोधनातें. घेउनि हे कीं उगेंचि राहोत ॥ ॥
पाहोत युद्धकौतुक, परि भीतिनदींत हे न वाहोत ॥१९॥ ॥
ख्यात जगांत धनंजय, पाहुनि मी कर्ण काय गाऊन ॥ ॥
गाती गातिलहि कवी. स्वगुण स्वमुखेंचि काय गाऊन ॥२०॥ ॥
पाहोत सिद्ध विद्याधर मुनि गंधर्व देव शुद्ध रण ॥ ॥
करितों आजि सुयोधनहृच्छल्याचें सुखेंचि उद्धरण ॥२१॥ ॥
हो स्वस्थ स्वमनस्था, आधिर्नगा भरतसौर्थपा खाणी ॥ ॥
मच्छरटंके सहाया. कैंचें सामर्थ्य पार्थपार्श्वीणीं ॥२२॥ ॥
म्यां जोडिलीं सदस्त्रें. शस्त्रें जालींच आजि अनपार्थें ॥ ॥
देउनि दर्शन केलें. माझें अतिमात्र हृष्ट मन पार्थें ॥२३॥ ॥
श्रीभार्गवास्त्रतेजें, भंगावें संगरांत सुत्राम्या ॥ ॥
आश्चर्य काय त्याच्या. केलें जरि भग्न आजि पुत्रा म्या ॥२४॥

---

१ मनोव्यथा २ सेनांहीं ३ उणा ४ आधिपर्वतास ५ भरथसमुदायरक्षका ६ टांकी
७ अतिशय ८ इंद्रास.

त्यासि कृप ह्मणे कर्णा, सुज्ञांहीं ऐकतांचि डोलावें ॥ ॥
ऐसेंचि बोलणें जरि, तरि पुरुषानें दाह्यांत शोभावें ॥२५॥ ॥
तूं नीतिविरुद्ध वदसी, साहस हें फल न दे वचनयज्ञ ॥ ॥
अद्भुत कर्म करूनिहीं, या न वदति एकहा वच नयज्ञ ॥२६॥ ॥
तूं भोगसाल कैसा, आला बांधोनि काय हात रणा ॥ ॥
सर्वाहितांधकार,ध्वंसकर मनुष्यकाय हा तरणी ॥२७॥ ॥
एकेंचि खांडववनीं, या पार्थें अग्नि तर्पिला कर्णा ॥ ॥
सर्व सुरांच्या स्वधनुर्ध्वानेंचि त्रास अर्पिला कर्णा ॥२८॥ ॥
एकेंचि भगवदनुजा, हरिली त्याला न लेश कलह झाला ॥ ॥
जरि खवळला पिवूनी, प्रभु खलबलदलनदक्ष बल हाला ॥२९॥
एकेंचि ईश्वरासीं, केलें युद्ध प्रसिद्ध राधेया ॥ ॥
एकेंचि असुर वधिले, तन्माया एकहा न बाधे या ॥३०॥ ॥
एकेंचि जिंकिला तो, गंधर्वाधीश चित्रसेन रणीं ॥ ॥
रोमांचित तनु होतो, वीरधनंजयपराक्रमस्मरणीं ॥३१॥ ॥
एकें त्वां काय कथा, केलें कर्णा स्वकर्म वाखाग ॥ ॥
होरेक वीरकरग नघटकेंहि चिरे न जेंवि पाखाण ॥३२॥ ॥

---

१ सर्वशत्रुरूपतमाचा नाशकरणारा २ मनुष्यदेह ३ द्रौपदी ४ बलराम ५ कर्णा ६ हिग

घालूं पाहसि दंष्ट्रा, उपडाया अहिमुखांत आंगोळी॥ ॥
ऐसें साहस करितां, होइल तनुची पळांत रांगोळी॥३३॥ ॥
कंठीं बांधोनि शिळा, बाहुबळें सागरांत तरशील॥ ॥
परि साहसें न विजया, हें शील नसो असो इतर शील॥३४॥
सर्वहि मिळोनि भांडूं, कर्णा व्हावें न साहसा मान्य॥ ॥
यत्नें नृपयश रक्षूं, आजि नव्हे श्वेतवाह सामान्य॥३५॥
द्रोणि म्हणे एकाकी, तूंचि क्षम जिष्णुवारणा सूत॥ ॥
[illegible] बहु करालसि, तूं तेंवि जिष्णुवारणा सूत॥३६॥
कारसि विकत्थन जिंकुनि, नेलें नसतांहि गोधन शिवेंतें
क्षत्रिय शास्त्रिं यश कर्णा, भलत्या न करूनि शोध न शिवे तें ३७
आहे विविधा नदन, वाहे पृथ्वी चतुर्विधें भूतें॥
आहे उगीच कर्णा, न कधीं बोलोनि दाखवी भू तें॥३८॥
जाळी ज्वलन न बोले, न वदेचि जरि प्रकाश करि तरणी॥ ॥
न वदोनि कुलज पुरुषहि, आले स्वयशःप्रकाश करित रणीं ३९
पावूनि सर्व महितें, विगुणांहि गुरूंसि जे कुळज नर ते॥ ॥
सत्काशिति अलि कमळीं, तेंवि गुरुपदीं महाकुळजन रते॥४०

---

१ सर्पमुखांत २ अर्जुन ३ अर्जुननिवारणावि० ४ कोळिष्टकाचें ५ ऐरावतास ६ व्यर्थ बडबड ७ भूमि ८ अग्नि ९ सूर्य १० भ्रमर

राधेया उन्द्धत तूं, हा दुर्योधनहि फार उद्धतरे॥ ॥
गुरुनिंदक हो स्पष्ट, व्यसनांत बुडे अशुद्ध शुद्ध नरे॥४१॥ ॥
छद्मेंद्यूतें केल्या, सत्सर्वस्वापहारकर्मातें॥ ॥
पुरुषार्थ श्लाघ्य असें, मानुनि पावेल कोण शर्मातें॥४२॥ ॥
कोण्यारणांत पांडव, जिंकुनि तद्राज्य साधिलें वदे रे॥ ॥
कृष्णोसि जिंकिलें त्वां, कोण्या समरांत सांगरे सदरे॥४३॥
तुज कीर्ति पांडवां अपकीर्ति ह्मणे ऐकवी कर्तेम रण ॥
सावध रे कां घेसी, मंदा खळनायका विकृत मरण॥४४॥
सिंहासि द्वेष करुनि, कोण बळी वारणांत उरणारे॥ ॥
कां भ्रमलासि कसा त्वां, जय पावावा रणांत उरणा रें॥४५
अरिच्याहि सद्गुणातें, प्रेमें वाखाणितात सुज्ञानी॥ ॥
खळ हा मग वर्णावा, कां न जगन्मान्य शिष्य सुज्ञांनीं॥४६
तुजहुनि विशिष्ट वीर्ये, चापीं जो शक्रसंगरीं जिष्णु॥ ॥
कोणा सुज्ञासि नव्हे, तो पूज्य स्तुत्य शंभुसा जिष्णु॥४७॥ ॥
सुत शिष्य सम तयांत, व्याधी खळमति खरे असु ज्ञाते॥
प्रिय नसतील कसे जे, साधु यशस्कर खरे असुंज्ञा ते॥४८

---

१ कपटयूतानें २ सुखातें ३ बोल ४ साधुद्वेष्या ५ कोणातें ६ बोकडा ७ इंद्रयुद्धीं ८ जयपावणारा ९ अर्जुन १० मूर्खा.

केलें दुर्द्यूत जसें, त्वां शक्रप्रस्थ तें जसें हरिलें॥ ॥
स्वसभेंत आणिलें त्या, साध्वीस जसें न भय मनीं धरिलें ४९
आतांहि तसेंचि तुवां, पार्थासीं धैर्य धरुनि भांडावें ॥
मांडावें कर्णशकुनि,संमत पांडित्य अन्य सांडावें॥५०॥ ॥
पाचांसहि जो जिंकी, सोडुनिया कुरुसभेंत अक्षे मद्दा
एकाशि शकुनिमामा, जिंकाया काय आजि अक्षम हा ५१
आह्मी आजि झगडतों, जरि येता तो विराट तरि त्यासीं
झगडोंना शब्देंही, पार्थासी लवहि अघ न करि त्यासीं ५२
भीष्म ह्मणे द्रोणे तूं, उत्तम वदलासि कृपहि शुद्ध वदे ॥
धर्मन्यायोचित जें, तेंचि सुभाषण मनासि उद्बोधें दे॥५३
क्षत्रियधर्में केवळ, इच्छितसे युद्ध कर्ण उत्साहें॥ ॥
उचितचि परंतु अनुचित, करणें गुरुची टाहांत कुत्सा हे ५४
द्रोणद्रोणिकृपांहीं, आजि करावी क्षमा न कोपावें॥ ॥
भेद नसावा बुधहो, भेदें स्वयश न परांसि ओपावें॥ ५५
दुर्योधन नमुनि ह्मणे, गुरुजी मज अरिकरीं न सोपावें
तेजोजननार्थ तसें, वदलों त्वन्मत्सरीं नसो पावें॥५६ ॥

---

१ कपटद्यूत २ इंद्रप्रस्थ ३ फांसे ४ असमर्थ ५ हर्ष ६ निंदा ७ उत्साहप्रा स्यर्थ.

हांसोन द्रोण ह्मणे, आह्मा कोपीन देचि वत्सलता॥ ॥
नसतें क्षमाकवच तरि, हृदयीं स्वच्छब्द अज्ञानिवत्सलता ५७
भीष्मासि मग ह्मणे नृप, पुसतों अज्ञातवास पण पुरला॥
कीं कांहीं मास तरी, पक्ष तरी दिन तरी असे उरला ५८
भीष्म ह्मणे गांधारे, पांडव पंडित स्वरे न दभ्रमती॥ ॥
न भ्रमले जे प्राकृत, तेचि मनीं धरुनिया मद भ्रमती ५९
कामी कोपी लोभी, जे संसारांत पावती भ्रम ते॥ ॥
प्राकृत पंडित पांडव, नसते तरि हेहि केवि न भ्रमते ६०
शास्त्रमतें मास द्वय, पांचां वर्षांत अधिक लेखावे॥ ॥
अज्ञातवास वास्तव, सरलाचि असेंचि तत्व देखावें॥६१
तेरा वर्षांत अधिक, दश पक्ष द्वादश क्षपा पडती॥ ॥
चांद्रशरन्मानें हे, संख्या संख्यावदाहता घडती॥६२॥ ॥
एवंच चांद्रमानें, तेराहि स्पष्ट सारिले अब्द॥ ॥
सत्यप्रतिज्ञ पांडव, लागूं देती न आपणा शब्द॥६३॥ ॥
येतां अन्यायलवें, अल्पायामेंहि इंद्रपद पदरा॥ ॥
हूं न ह्मणति जे काळा, पासुनिही पावती कधीं न दरा ६४

---

१ दयाळूपणा २ वज्रासारखा ३ अल्पमती ४ रात्री ५ ज्योतिषवेत्त्याहीं कथित.

युध्द करूनि पार्क्षिक जय, त्यांतहि विजय पातला समरा॥
सम रामासीं ह्मा हो, सम राज्यसमर्पणें हठें न मरा॥६५॥
कुरुधम ह्मणे युद्धचि, हो सख्य नहो पितामहा यासीं॥
शत्रुहि बुडेल यानें, मत्पृत पद ओपितां महायासीं॥६६॥
भीष्म ह्मणे तरि कांहीं, बळें घेऊनि जा पुरा नको राहूं॥
वा हूं मजचि ह्मण न त्या, द्विषदंगारचिया चकोरा हूं॥६७
आह्मापासीं राहो, अर्ध कटक पार्थसिंह घेराया॥ ॥
एके भागें न्याया, गाई तूं एक भाग घे राया॥६८॥ ॥
मी कर्ण कृप द्रोण, द्रौणि असे हे रणांत पांच कसा ॥
उतरो धनंजयाच्या, की उतरो तूंचि मात्र वांच कसा ६९
धाडुनि पुढें नृपाला, त्यामागुनि गोधनासि सत्वरची॥ ॥
शास्त्रमतें व्यूहातें, तत्काळचि तो अगाधसत्व रची॥७०॥
कर्ण पुढें गुरु मध्यें, ज्याच्या तेजासि शत्रुहि न साहे॥ ॥
दोभागीं द्रौणि कृप, व्यूहामागें नदीज तो राहे॥७१॥ ॥
द्रोण ह्मणे सैनिकहो, हा आला कीशकेतु अर्जुन हो॥ ॥
कोण क्रुद्ध न ह्मणेल, ख्यात जगीं विजय विजय अर्जुन हो

---

१ अनियमित २ सैन्य ३ शत्रुरूप इंगळांस ४ अश्वत्थामा ५ कसोटीस लाना ६ अपरिमितबळ ७ भीष्म ८ वानरध्वज ९ सुयश १० शुभ्र.

हे दोन बाण माझ्या, चरणावरि उतरले पाहा नमना॥ ॥
या गौरवें मजपरिस, गमला कनकाद्रिही लहान मना॥७३
हे अर्जुननामांकित, शर मत्कर्णद्वयासि लागोनि॥ ॥
पडले पहा अहा रण, न करी आज्ञा मला न मागोनी॥७४
जाले बहु होतिल बहु, आहेतहि बहु परंतु यासम हा॥ ॥
यास महादेवा दे, जय पाहिन कधिं धनंजयास महा॥ ७५॥
पार्थ ह्मणे वैराटे, रथ कुरुकटकासमीप राहूं दे॥ ॥
गोधनहरावयास्तव, भेट आले कोण कोण पाहूं दे॥ ७६॥
तो गुरु तो गुरुनंदन, तो कृप तो कर्ण तो पितामह रे॥
यांहीं धेनु वळाव्या, शिव शिव गोपाळ कृष्ण राम हरे७७
रे उत्तरा शकुनिचा, या व्यूहांत न दिसे मला भाचा॥ ॥
त्या वांचुन यांसीं जो, करणें संग्राम तो न लाभाचा॥७८॥
बहुधा गोधन घेउनि, मागें गेला पळोनि कातर तो॥ ॥
सर्वहि खोटा व्यसनीं, बुडतो न पळो पळोनि कां तरतो७९
हें कटक सोड तिकडे, चाल तुझ्या हरुनि गोधना खळ तो
प्राणत्राणपरायण, जिकडे निरपत्रपाग्रणी पळतो॥८०॥ ॥

---

१ बाण २ योद्धे ३ अश्वत्थामा ४ भीष्म ५ मित्रा ६ प्राणरक्षणपर. ७ निर्लज्जश्रेष्ठ.

उत्तर निज तुरंगांतें, घाया अरुणासि कौतुक पिटाळी॥ ॥
तो गर्जोनि कुरुकटक, कर्णी बसवी ध्वजस्थ कपि टाळी॥ ८१
रूप सैन्यासि ह्मणे हो, हो प्राभारिष्ट शांत न वधावा॥ ॥
राजा पार्थे सांगेप, सगुरु सगुरुसुत सशांतेनव धावा ८२
गांठुनि पार्थ ह्मणे रे, आलों मी अनुज भीमसेनाचा ॥
ज्याच्या शरांसि ह्मणती, सुर असुर बळांत भीमसे नाचा ८३
कोठें जाल उभे रे, मत्स्येश्वरधेनुपश्यतोहर हो॥ ॥
सोडा गोधन नाहीं, तरि वधिन तुह्मासि वश्य तो हर हो ८४
शर पटलानें झांकी, कुरुकटकालाचि तो न वासवि त्या॥
खचर ह्मणति तेजस्वी, लोपविता भेटला नवा सविता ८५
सुरदत्त धनुर्गुण रथ नेमि ध्वजवाभिभूतनादानी॥ ॥
कांपे न चमूचि कुंहीं, स्वकुचाच्या जेंवि पूतना दानी ८६
खळबळजलनिधिमग्ना, धेनु उसळल्या अलाबु जाल्या हे
गमे विजय मनि ह्मणे कां गोपसरच्या मला बुजाल्या हो ८७
गेल्या पळोनि गाई, पृष्ठोपरि पुछभार वाहोनी॥ ॥
राहोनि निश्चल क्षण, विजय निवे त्याकडेचि पाहोनी ८८

---

१ मारुति २ अंगदेशाधिपासहवर्त्तमान. ३ भीष्मासह ४. धाकटाभाऊ ५ विराटधेनुलुटारे ६ अर्जुन + देव ७ सूर्यास ८ शरस ९ चक्रधारा १० मारुती १० पृथ्वी ११ भोपळा.

येतांचि विक्रमलवें. श्रीहरिचा दयितदास वीर गडा॥ ॥
हरि करिघटेसि तैसा, त्या कुरुसेनेसि वासवी रगडा॥ ८९॥
अंगावरि गोरज तें, श्रीगोपाळांघ्रिचेंचि भावुनि घे॥ ॥
जाया सुयोधनावरि, भीमाचा भीमशक्ति भाऊ निघे॥ ९०॥
भीष्मादि ह्मणति गेला, कीं हो दुर्योधनांत काम खरा॥ ॥
धावोनि गाठिती त्या, जयलक्ष्मी दत्तकौतुका मखरा॥ ९१॥
पाहुनि बीभत्सु ह्मणे. आला दुर्योधनावना कर्ण॥ ॥
म्या ऋण परिग्रहाचें, वारावें आजि जेवि नाकर्ण॥ ९२॥ ॥
तत्काळ उत्तरें तो. नेला कर्णाकडेचि रथ वातें॥ ॥
घन गिरिकडे सुवेगें, स्वौषध रुग्णाकडेचि अथवा तें॥ ९३॥
भंगुनि सहाय मारुनि. बंधु हराया समस्त तन्मद हा॥ ॥
पार्थ शरांनी झांकी, देखोनि ह्मणे तदीय जन्मद हा॥ ९४॥ ॥
(अग्नि) दव जेवि तृणावरणा, द्वेष भस्मकरीमहाशरावरणा॥ ॥
पार्थ ह्मणे करितो गिरिशकमंडलुसी पहा शराव रणा॥ ९५॥
कर्णाहि इषुनी झांकी, मग त्यांमोक्षेंच मानसाध्वसखा॥ ॥
रुग्णाऽनल्वा ह्मणे जो, खांडव सोडूनि सर्व साध्वस खा॥ ९६॥

---

१ पराक्रमलवें २ प्रियदास ३ इंद्रपुत्र ४ भयंकरशक्ति. ५ अर्जुन ६ दुर्योधनरक्षणार्थ + स्त्रीचें ७ देवऋण ८ मेघ ९ रोग्याकडे १० त्याचा गर्व ११ रवी १२ कर्ण १३ परळ १४ मोक्षेंच मानसमार्गजो कृष्ण त्याचा सखा १५ भय.

तें किति वर्णावें म्या, पाहत होते विचित्रसमरा जे॥ ॥
कर्णाच्या अपयानावधि ते गमलेचि चित्रसम राजे॥२७॥ ॥

इतिश्रीमहाभारतेविराटपर्वणिद्रोणकर्णसंवादोर्जुनप्रगटोनाम अध्यायः

कर्णापयानकोपें, झालीं सैन्यें समस्त येकवट॥ ॥
त्यांत धनंजयरथ तो, जैसा प्रलयार्णवांत येक वट॥१॥ ॥
जाणों बुभुक्षितां तें, तो दुष्काळांत अन्न दे खाया॥ ॥
सदयोदार शतमख, ये होउनि सुप्रसन्न देखाया॥२॥ ॥
होत्ये यदंशशेषश्वासज्वलनांत हे समिद्ध रणीं॥ ॥
त्याचा सखा धनंजय, होय खलशलभलया समिद्ध रणीं ३॥
कोणाचेंहि शरीर, अंगुळहि अविद्ध तो न राहूं दे॥ ॥
मुनि ह्मणति खळांस हि गति, वा नारायणसख्या नरा हूं दे ४
वाहे शोणितपूरीं, शतश इभांचें हि कुणप टोळाचा॥ ॥
मद ।कोन गरुडी सद्धर, भुज भुजगहि वारिति गुण परोळाचा ५

१ पलायनपर्यंत २ इंद्र ३ समिधापृथ्वी ४ खलपतंग नाशाग्निपर्यी ५ प्रदीप्त ६ गजाचे ७ प्रेतें ८ पडूळाचा.

इतरांची काय कथा, अद्भुत संगर करी सहास रूप॥ ॥
होय विरथ सुर ह्मणती, सिंह पथ न दे करीस हा सरूप ६
बीभत्सु पुढोनि विरथ, सुविकळ रूप पळविला नरवरानीं॥
तद्धनुचा भयद [1]रवें, हरिचाहि तसा गजां न रव रानीं॥७॥
मग गगनगनग[2]भिन्मुख,स्मरमत गुरुसीहि अनव मुनि नर तो
कलह करी कीं इतरीं, गुरुकलही यासि जन व मुनि न रतो ८
गुरुच्या प्रथम रथासी, रथ भिडवी क्षिप्र मग अकोपार्थ॥ ॥
शिर चरणासि शर्थुनि, करुणेसि ह्मणे त्यजूं नको पार्थ॥९॥
गुरुजी करा प्रहार, प्रथम तुह्मी गुरु अविप्र हा [3]रामीं॥ ॥
शांतनवसा करीन, प्रमुदित व्हाया कवि प्रहारा मी॥ १०॥ ॥
सच्छिष्यावरि सद्गुरु, आधी प्रेमें करूनि आ[4]शींची॥ ॥
मग वृष्टि बहिः कोपें, सुबहु करी बहुविधेषु[5]राशींची॥ ११॥ ॥
गुरुला विविध शरांची, वाहे तो [6]शराशि लाखोली॥ ॥
भेटे अस्त्रनति तया, जशि पाहे सागराशिला खोली॥ १२ ॥
शरसागरीं तिमिंगिल, गुरु पळभरि होय शिष्य [7]कंप्रतिमी ॥
परिभूत द्रोण ह्मणे, श्रीभार्गवसाचि धन्य संप्रति मी॥ १३॥ ॥

---

१ शब्द २ आकाशगन देव इंद्र प्रमुख ३ परशुरामीं ४ आशीर्वाद ५ बाणराशींची
६ शस्त्रपरंपरा ७ चंचल मत्स्य.

त्यासमयीं शंभु ह्मणे, जरि तूं रूसमिल तरी उमे रूस॥ ॥
गुह काय विदारिल हा, वत्स विजय शक्तिनें सुमेरूस॥१४॥॥
करिती सूर्यास्तोदय, एक मुहूर्तांत एकशतदा ते॥ ॥
त्यांत न एकासमही, होती मेघां असेहि शत दाते॥१५॥॥
पाडिति शरपटलानीं, जेव्हां नभ भरुनि अंधकारातें॥ ॥
कांतर ह्मणति असमयीं, करविसि कां कल्प अंधकारातें॥१६
द्रोणार्जुन तुल्यक्रिय, बिंबप्रतिबिंबसेचि ते गमती॥ ॥
कित्ति कुरुकटकप्रेक्षक, वृत्रघ्नाचींहि लोचनें भ्रमती॥१७॥ ॥
समरीं शंकरसाच, द्रोण गमे जिष्णुही अजितसाच॥ ॥
त्रिजगद्विस्मयकर अति,अद्भुत परिभवहि तो अजितसाच १८
सुरमुनि ह्मणति छात्रें, छिन्नध्वजकवच गुरु पहा केला॥
जालीं बळें पराङ्मुख, मारितसे कुमति कुरुप हाकेला॥१९॥
अधिका न क्षत्रियता, न न्यूना विप्रता पहा तरणा॥ ॥
नसतांहि कसा ज्याचे, विक्षतहि न विप्रताप हातरणा॥२०
केला शीघ्रास्त्रबळें, शिष्यें परिभूत सत्वराशि कवी॥ ॥
याचि सुयशोर्थ बहुधा, न शिके हा गुरुहि न त्वरा शिकवी २१

---

१ शंभरदा २ मित्रे ३ प्रलय ४ शकरा ५ इंद्राची ६ विष्णूसारखा ७ शिष्यें ८ सैन्यें ९ दुर्योधन १० श्रेष्ठ

अश्वत्थामा धावे, रक्षाया संकटांत जनकास ॥ ॥
जन कासया विते सुत, कसितें न करावया भजन कास २२
इंद्रोपेंद्र तसे ते, गुरुबंधु सरवे कृपी[1] पृथातनय ॥ ॥
धन यश ज्यांचें त्यांतहि, उठवा वैरासि शकुनिचा अनय २३
तो उत्तमेर्णसा[2] गुरु, सोडुनि पुत्राकडे हरिसरव[3] वळे ॥
पितृप्रताप हरणें, द्रोणिहि त्हतमणिफणीपरिस स्वदर्पे ॥ ॥
सांवर्तिक[4] मेघांच्या, लाजाव्या द्रोणिसायकां धारा ॥ ॥
सत्तातांहुनि होइल, सुत ह्मणवायासि हाय कां धारा ॥ २५ ॥
अत्युग्र राम कीं हा, द्विज ह्मणति असें पराशर व्यास ॥ ॥
काळहि चुकेल याचा, न चुकेलचि शर परा शरव्यास[5] ॥ २६ ॥
बहु कल्पना सुकविसा, विजयहि बहु शरपरंपरा व्याला ॥ ॥
भंगू पाहे समरीं, गुरुपुत्रासहि जसे परा[6] व्याला ॥ २७ ॥
ज्या इषुनीं क्षत होतां, रागें वरि आंतही हर भरे हो ॥ ॥
ते द्रोणिशरा जैसे, कपिला[7] दासें दिले हरभरे हो ॥ २८ ॥
तें सुर नर हय गज हा, ह्मणति न याचेचि आठवा जी हा ॥ ॥
घडलें गुर्वघ[8] जाया, अद्भुत संग्राम आठवा जी हा ॥ २९ ॥

---

१ अश्वत्थाम्याची आई २ ऋणदात्यासाररवा ३ अर्जुन ४ प्रलयकालीन ५ संग्राम ६ लक्ष्यास + प्रीतीनें ७ वानराला ८ महापातक.

आचार्यसुतें केली, छिन्ना सोडूनि खरशारा ज्यातें ॥ ॥
पाहूनि मुनिहि ह्मणति हा. पावेल अजातरिपु न राज्यातें —
नीपेंद्रमुख नरामर, ह्मणति भला गा भला महाबाहो ॥
त्वद्दोःप्रताप अतिनर, अद्भुतचि कधीं उणा न हा बाहो ३
झांसे नारायणासख, तें सज्य पुन्हा करून कोदंड ॥ ॥
जें काळासि ह्मणे गा, झांक भजपुढें करूं नको दंड ॥ ३२ ॥
शक्र ह्मणे व्यर्थ भरी, हा त्यजुनि विचार तर्क विप्र भरे ॥
त्या तुझ्या शरानीं, केला सुप्रभहि अर्क विप्रभ रे ॥ ३३ ॥ ॥
स्त्रीस ह्मणे वत्साचे, तैसे गुरुसूनुचे शरचि न भाते ॥ ॥
अक्षय्य काय असते, तरि करिते निरवकाशचि नभातें ॥ ३४ ॥
प्रतिरथमिषें शरानीं. भरतां कुंथावयासि नभ लागे ॥ ॥
देवी ह्मणति सख्यांनो, दारुण हा क्षात्रधर्म न भला गे ३५
करितां तुमुलतर समर. शर सरले गुरुसुतीं उणे होते ॥
पूर्णत्व पांडवीं हें, एकें हरिदासता गुणें हो ते ॥ ३६ ॥ ॥
झाले भाते समरीं. आणाया गुरुसुतीं उणीव रिते ॥ ॥
देता सामग्री जय, तरि कां सन्नीतिला गुणी वरिते ॥ ३७ ॥

१ धनुर्गुण २ निस्तेज ३ इंद्राणी.

भंगे अश्वत्थामा. अश्वत्था मी क्वचित् सदा हरिला ॥ ॥
तसि इतरासि जयश्री. नित्य हरिजनासि तो तिणें वरिला ॥३८
करितां पार्थे गुरुकृत. घटजें मुनिवरें समुद्रसाचि रिता ॥ ॥
धावे कर्ण गजावरि, हरि नरवरानीं तया जसा चिरिता ॥३९
कर्णधनुर्ध्वनि कर्णीं. शिरतां तिकडेचि पार्थ तो पाहे ॥ ॥
राहे अश्वत्थामा. कढले चढले अपार कोपा हे ॥४०॥
पार्थ ह्मणे रे कर्णा. बहु भट मजसीं भिडोनि गडबडती ॥
ही आजि आजि आहे, नोहे केली सभेंत बडबड ती ॥४१
तेव्हां पांचहि आह्मी, होतों दृढ धर्म पाशबद्ध रणीं ॥ ॥
आतां स्मरलों खळहो. कसि हरिली कपट करुनि सद्रणी॥४२
कर्त्यन स्मकर स्मदुष्कर, समर अमर यमरवींद्रसुरवहि तुला॥
होउन सहाय न जयें, होय खळांच्या कधींहि सखहि तुला ४३
जें गांजिली कुरुसभे मध्यें त्वां बायको निकर करुनि॥ ॥
बांधावेंचि यमें तुज, पुरतें तें नायकोनि करकरुनि ॥४४॥
तेव्हां यमधर्माचे, अस्मद्धर्मापुढें न बळ मांडे॥ ॥ ॥
आजि तुह्मीं ओगरिलों, काळामंत्रांत सर्व खळ मांडे॥४५

---

१ लक्ष्मी २ अगस्तीनें ३ सिंह ४ बडबड ५ अवकून ६ वाढिलो ७ काळरूपपात्रांत

कर्ण ह्मणे आलों बळ, दावायास स्वयें पहायास ॥ ॥
शोभे समरीं न तसा, न भटांच्या भाषणीं महा१यास॥ ४६॥
बहु कर्म करी पंडित, कथनावसरींहि थोडकेंच वदे॥ ॥
शाकांत परवर जसे, पथ्यहि तेसे न दोडके चव दे॥ ४७॥
केला पण पूर्ण ह्मणसि, आलासि करावयासि कळहास॥ ॥
ये मजसीं युद्ध करी, हो भग्न करोत हे सकळ हौस ॥ ४८॥
तूं काय वासवासहि, पळवीन रणांत आजि भंगुन गा॥ ॥
बहु हास्य येतसे कीं, पाहे लंघावयासि पंगु नगा॥ ४९॥
पार्थ ह्मणे राधेया, करुनि पलायनहि तूं न लाजसि रे॥ ॥
साध्वी विटोलयीं जसि, तसि बहुधा त्वन्मनीं न लाजसिरे॥५०
मारविला मजकरवीं, त्वां अनुज न तारिला न तारविला॥ ॥
जारविलासन्याय स्मरला, या खळतमाचिया रविला॥ ५१॥
ऐसें वदोनि सहसा, न पाहवा साधुधर्महानिकर ॥ ॥
ह्मणुनि शरांचा सोडी, झांकाया त्यासि तो महा निकरें॥५२
हस्तीं हाणुनि खरतर, शर नरमुष्टीस कर्णसमरांत ॥ ॥
सहसा विशीर्ण करिता, जालाहोताचि मान्य अमरांत ॥५३

---

१ हास्य २जारगृहीं ३समूह ४तीक्ष्ण

त्या कर्णाच्या तोडी. तो हरितनुजनु धनुष्यवल्लीला ॥
जन ह्मणति मूर्त काळचि. हावरि दावी मनुष्यवल्लीला ॥ ५४
उरें कोपें रोषें. भेदी मूर्छार्थ अंगपोरोला ॥ ॥
रविहि नभांत बुडे हो, न घडूं द्यावा कुसंग पोराला ॥ ५५ ॥
हरिहरगुरुप्रसादज, अमित निजभुजप्रताप कळवीला ॥
वळवीला कर जाणों, तोगर्वयशःसमेत पळवीला ॥ ५६ ॥
भीष्मावरि जातां धृति. मान् केला जेविं वज्रकवचांनी ॥
भ्रांत भ्रांतस्वांत. स्वांतत्रासार्त्त उत्तर वचानी ॥ ५७ ॥
तद्वैर्यार्थ स्वयशें, वर्णी स्वमुखें जरी न गानावीं ॥ ॥
स्थिर त्यासि रथीं करि गुरु. जैसा हरिच्या स्कमानवा नावीं ॥ ५८
कुरुगुरुपितामहासीं. जिष्णु करायासि काय कल्हातें ॥
कीं साधुच्या स्कसाधुहि. पावे दुःसंग भंग फळ हातें ॥ ५९
नारायणप्रियसखें, सर्वमुनिवरें नरें स्करोपास्यें ॥ ॥
प्रथमचि पितामहाचा. ध्वज तोडुनि पाडिला सुरूपास्यें ॥ ६०
पाखंडागम रोधूं, पाहति येऊनि आड वेदांस ॥ ॥
पार्थासि नसे कौरव. ज्या यावे एक आडवे दास ॥ ६१ ॥

---

१ इंद्रपुत्र २ कर्णाच्या उराला ३ पृथ्वीसंबंध ४ गर्वयशांसह ५ स्वमरण भयपीडित ६ कपटीसाधु

खळ दुःशासन दुःसह, आणि विविंशति विकर्ण हे चवघे ॥
विजयें दमुनि पळविले, दोष जसे दाशरथिगुणें अवघे ॥६२॥
सर्व महारथ ह्मणती, त्या विजया वासवा जसें नग हूं ॥
केले पिष्ट असुरगिरि, जेणें किति त्यासते नसे न गहू ॥६३॥
हरिनीं गजसे कुरुभट, जिष्णुशरानीं उदंड लोळविले ॥ ॥
दिव्यांगना सह गगनयानीं मग वेसवूनि वोळविले ॥ ६४
क्षत्न जेन द्या पक्षिरवें, ह्मणती वीरासि आयका मन द्या ॥
आह्मा ऐशा बुडवुनि, करिति दुज्या पूर्ण काय काम नद्या ६५
युद्ध न हरि सरव मांडी, त्या सद्यः स्वर्गहेतु सत्रांस ॥ ॥
आले सहस्रशः कृत, कृत्य न जाले कृतार्थ सत्रांस ॥ ६६॥
कर्ण कृप द्रोण पुन्हां, धावुनि पार्थासि येकदाचि तिघे ॥
झांकिति दिव्यास्त्रांनीं, नें तो पळभरि महाचळस्थिति घे ६७
योजुनि इंद्रास्त्रातें, पळवी सकळांसि तो महातेजा ॥ ॥
भांतिल त्या रिपु न कसे, भीती गगनस्थही पहाते ज्या ६८
द्रोणा द्यखिल पळवितां, भीष्म प्रफ कार्मुकासि आकर्षी ॥
केतुस्थ वानराला, तो ताडी खिन्न होय नारदर्षी ॥ ॥७०॥

---

१ म्लून द्या २ यज्ञास ३ मभय ४ पाहणारे ५ ध्वजस्थ ६ नारद

नर नरच्छस्त्रें छेदी. लाजे पूर्णेंदुपांडुश ज्यातें ॥ ॥
तत्कृतकृतनिजपूर्वजलंघनही श्लाघ्य पांडुराजातें ॥ ७०॥
चित्तीं भीष्म ह्मणे मज.वर कर शस्त्रास्त्रवृष्टि वत्सा हूं ॥ ॥
आह्मी पुण्ययशोर्थ. स्वशरीरीं दिव्यदृष्टिवत् साहूं ॥ ७१॥
नरहि ह्मणे ज्यासि दिले स्वमुरवींचें त्वां पितामहा घांस ॥
तोह्मा तुसीं झगडतो, होवुनिया स्थापिता महा१घास॥ ७२
पांघुरविलें स्वयें प्रिय. पौत्राला शस्त्रवस्त्र शांतनवें ॥ ॥
तत्काळ योजिलें हो. पहिलें होतांचि अस्त्र शांत नवें ॥ ७३
योजी आजावरि शर, पटल करुनि चाप सज्ज नातू तें॥
पाहुनि कुळज कवि ह्मणति. हें परम श्लाघ्य सज्जना तूंतें
भीष्में विजयेंहि समचि, शस्त्रपटळ सबहुमान वारावें ॥
अमररवेंचि भरावें, तें नभ बहु न बहुमानवारावें ॥ ७५॥
मानी वृद्ध प्रेक्षक, ह्मणती अपयश कधीं न यो जीनो ॥ ॥
तरुण ह्मणति असोनी, श्रीपाशपनहि अधी न योजीना ७६
साधु प्रेक्षक स्कर नर. ह्मणनि भला साधु धन्य शांतनवा ॥
तूं रविसा दीपकसा, योद्धा होतांचि अन्य शांत नवा ॥ ७७

---

१पूर्णेंदुशुभ्रता २ बहुनमनुष्यांच्याशब्दानें ३ मानवंत ४ पाहणारे ५. येवो ६ हृह्मास

पार्थप्रतिभट गुरु कीं, जो होय निमित्त पूतनामरणीं ॥ ॥
कीं तो प्रभु विजयप्रद, ज्याचें मुनिचित्त पूत नाम रणीं ॥७८
निज कुलगुरुरूक्तीप्रति, परिसुनि अभिमन्युचा पिता महती
तच्चापलता खंडी, वर्णी धानुष्कता पितामह ती ॥ ७९ ॥
पार्थमनीं साधावी, जिंकुनियां कुरुपितामहा महिम्यां ॥
ऐसाचि पात्र व्हावा, सुरलोकीं गुरु पिता महामहिम्यां ॥ ८० ॥
केलें सज्ज धनु असें, अतिसत्वर त्या समस्तयोधनुतें ॥ ॥
कीं दशशताक्षहि ह्मणे, तुटलें नाहींच कायहो धनुतें ॥ ८१ ॥
वरकड चित्रचि झालें, केवळ तें चित्रसें न तें ज्यांतें ॥ ।
हरिहर मानुनि वर्णी, हरिपासीं चित्रसेन तेजातें ॥ ८२ ॥
देवी ह्मणति न भ्यावें, हो सावध हे सुरापगे सारे ॥ ॥
त्वत्सुत ज्यांच्या पक्षीं, खळ केवळ हे सुरापगे सारे ॥ ८३ ॥
त्यांचा श्रम शमवाया, बहु शीतळ मंद गंधवह वाहे ॥ ॥
शक्र स्वयेंहि त्यांवरि, पुष्पें प्रेमाश्रुबिंदुसह वाहे ॥ ८४ ॥
सुरपुष्पवृष्टिला न, स्पर्शूं देती तयां तद्विपुर्दृष्टि ॥ ॥ ॥
कीं मधुपत्रुंबिता त्या, पतिता त्यांच्या पडूं नये दृष्टि ॥ ८५ ॥

---

१ धनुर्धरपणा २ इंद्र ३ आश्चर्य ४ गंगे ५ मारसूतें ६ मद्यपी ७ वायु ८ भीष्मार्जुन बाणवृष्टी ९ भ्रमर-मद्यपी

खंडी धनु'य द्याया, निजनिपुणत्वें प्रमोद पुनरपि त्या ॥ ॥
स्वगुणोत्कर्षें पूर्वज, जिंकुनियां सखविती नकुनर पित्या ८६
तुटलें कीं न अशा या, घाली जो संशयांत देव पुन्हा ॥ ॥
तें पार्थ ह्मणे आर्या, स्वांबोस्रें शुद्ध होउं दे वपुन्हा ॥ ८७
साहुनि पितामहाचे, त्याच्या पार्श्वींच तो असरख रचितें ॥ ॥
ह्मणी सत्वर खर शर, दश अमरांचेंहि ते अंसर खरचिने ॥ ॥
त्या खरशर प्रहारें, जो पावे मोह ओंपगेय महा ॥ ॥
देवी गंगेसि ह्मणति, मातु नव्हे नाइ आपगे यम हा ॥ ८९
कुरु ह्मणति हाय हाय न, व्हावा हा हरिनियाहि हत हा तें ॥
त्या प्राकृतांसि युक्तचि, गीर्वाणांलाहि ह्मणवि वन हा तें ॥ ९०
दुःखजहि सखद ह्मणती, कपि नारद रामराम शिवशिव तें ॥
यत्ध्वनि पतिता जीवा, बापा मुलसें बळेंचि शिव शिवतें ॥ ९१
पडतां मूर्च्छित नेला, माघारा भीष्म जाणत्या सूतें ॥ ॥
ईशप्रहिता देइल दुःखभज्या दिव्य बाण त्या सूतें ॥ ९२ ॥

---

इति आर्याभारतेवि॰ अध्यायः ॥ श्रीः ॥

---

१ समातृनेत्रोदक २ शरीर ३ प्राण ४ भीष्म ५ पराजित ६ कल्याण ७ रुई

जाल कर्ण कृप गुरु, प्रभ्रांते महावीरभंग नउठावें ॥ ॥
स्वबळसहित कुरूप उठे, जरि शिंक ह्मणे कदापि न उठावें ॥ १
हाणी भल्ले ललाटीं, त्यासि ह्मणे पार्थ हाण चवताळ ॥ ॥
धृष्टा दुष्टा भ्रष्टा, तुझिया वृत्तीं नसेंचि चवताळ ॥ २ ॥
हासे तो भरतेंनल्लज, भल्लज पीडा न तल्ललाटांत ॥ ॥
हेतींत पोहणारा, सिंधूच्या जेविं मल्ल लाटांत ॥ ३ ॥
होय कुरूप नरशरपरि, हत दवहृत जेविं कुंज रानीं कीं ॥ ॥
शिरला शरगणपंचाननत्या कुरुकटककुंजरानीं कीं ॥ ४
धावे विकर्ण सत्वर, कीं जो निष्फळ असो नराऽयास ॥ ॥
प्राणव्यसनीं सोडिल, केविं भ्राता असोन रायास ॥ ५ ॥
नर शर त्यावरि सोडी, वधिता तत्काळ तन्महेभातें ॥ ॥
प्रेमें ह्मणे पुजावें, म्या धनुसह बहुत जन्म हे भाते ॥ ६ ॥
खळ तत्सहायभंगचि, निज सद्रत हें मनांत आणून ॥
प्रथम विकर्ण पळविला, मग नृप तदुरांत बाणहाणून ॥ ७
मिळतां त्रिवर्ग सद्यश, सज्जन भेदील कां न नीचोरें ॥ ॥
जे खळ सर्वस्व हरी, धर्माचें जेविं काननीं चोर ॥ ८ ॥

---

१ बाणविशेष २ वीरश्रेष्ठ ३ शस्त्रांत ४ विकर्णगजानें ५ धर्मार्थमोक्ष ६ नी चोरें रस

कुरुण ह्मणे बा सूता, दे मज असुदान हाक हाक हरी ॥ ॥
प्राकृत न ह्मणतिल कसे, कां खवळविला नहाक हा केहरी ॥९
पळतां सुयोधनातें, पार्थ ह्मणे करुनि बाहु शब्द अरे ॥
कोठें जाशिल नाशिल, तुज दहना मन्नुः संदब्द अरे ॥१०
धृतांध गुरुमिथुन हो, बहु धन्य परंतु पापरत रे तें ॥ ॥
न मळो जाला असती, ज्या शुद्ध कुळीं अपाप रत रे तें ॥११
केले होते कीं त्वां, गुरुपासी सत्रधर्म मुखपाठ ॥ ॥
देती हृद्धचि उष्णा, कीं दहना व्हावयासि सुख पाठ ॥१२
कांपसि भयें रणसमय, हेमंतसमथ नव्हे तुझी आण ॥ ॥
मी सत्य धनंजय परि, पार्थ नव्हे असितपथ खरें जाण १३ ॥
ह्मणतां पुण्ययशःसुख, हेतु स्वदीन कां नको राहो ॥ ॥
ऐका निज मतिचे अभि, मानमलनिरुद्ध कान कोराहो ॥१४
स्वर्गति कपिलादानचि, घे बहुहित हेंचि तुज सुपाचाम ॥
॥१५
असु वसुचि मानलें परि, याला बहु काळसद्म्युचा चास
यशचि यशोभिरता बहु, मत नामचि एक जेविं नामरता ॥ ॥१६
अपयशचि कुजन सेवी, जाणुनिही पथ्य जेविना मरता ॥१७

---

१प्राणदान २अश्व ३अर्थ ४धनुष्यरूपसन्मेघ ५शत्रो ६अग्नि ७स्वर्गा [illegible]
९काळरूपचोराचा १० मरणारा

मान विसरला कीं तो, सरला रुसला अहो स्वयोधनें हो ॥
माणरहित हो परि पळभरि मानरहित कधीं स्वयोधे नहीं
असि कीर्त्ति सदा हरिस न, तसि आवडली नवी रमा नवरी
स्वांतःपुरांतही जो, गलकीर्त्ति करी न वीर मान वरी ॥ १८
इत्यादि नेर वदे जें, जालें त्या कुंजरासि अंकुश तें ॥ ॥
खळहृदय साधुवचनें, द्रववें न स्वतस लोहशंकुशतें ॥ १९
परते पैर पार्थावरि, पदपीडित पुच्छभाग तक्षकेसा ॥ ॥
न उगारेल गरुडसा त्यावरि तो दुष्टनाशदक्ष कसा ॥ २०
तेव्हां नृप रक्षाया, सावध होता नदीज त्यामागें ॥ ॥
कर्णोंहि वामपार्श्वीं, रक्षियला निधि जसा महा नागें ॥ २१ ॥
त्याच्या दक्षिणपार्श्वीं, अश्वत्थामा पुढें कृपद्रोण ॥ ॥
दुःशासनादि बहुखळ, होते आर्यांत योजिले कोण ॥ २२ ॥
ते लागले समस्तहि, शस्त्रांहीं एकदांचि वर्षाया ॥ ॥ ॥
हांसत ह्मणे धनंजय, याहो या एकदांचि वर्षाया ॥ २३ ॥
जें स्वरथाहि नशिवो, एकाही आशुगा न दे स्पर्शें ॥ ॥ ॥ ॥
शर्भ ह्मणे कर हरिहर, विजयांचें आशुगांस न देवर्षे ॥ २४

१ दुर्योधन २ उत्तमशूर ३ अर्जुन ४ शत्रु ५ सर्पासारखा ६ श्रेष्ठमंडळींत ७ इंद्र
८ शीघ्र ९ गायन १० नारद

साधु ह्मणनि हा होय. द्रोणप्रियशिष्य होय हरिदास[1] ॥ ॥
होय अजितसख ह्मणतिल घन[3] गुरुजी या शरपंजर[4] दास ॥२५
प्रथम परास्त्रें वारी. द्रुत[5] मग संमोहनास्त्र नर योजी ॥ ॥
चित्तांत ह्मणे गुरुजी, मुनिं बाणाक्षर सहाय हर योजी[6] ॥२६
संमोहनास्त्र चाप. प्रवर प्रोद्दाम देवदत्त दर[7] ॥ ॥ ॥
मोहिति परां नर तसा. होय जसा वामदेव दंतदर[9] ॥ २७ ॥
पार्थ ह्मणे भगिनीनें, स्मर उत्तर उत्तरा उतर वासें[10] ॥ ॥
घे कृपाचें अमले धनुच्या परिसोनि राउत रवास ॥ २८ ॥
डसला मोहाहि[11] सकल, गुरुस मग न कां सुयोधना चावे ॥
एक कबंधचि सक्रिय. हे हर्षाया सुयोध नाचावे ॥ २९ ॥
जा न हसावें न तुवां, प्यावें घेतां हरूनि नास कृपा[12] ॥ ॥
घे महुरुप्रसादहि, नत न लुटिति का बगा [illegible] सकृपा ॥३०
गुरुसकृतसुयोधनांचीं. नीळें भरितें सदा नत [illegible] ॥ ॥
घ्यावीं त्या काय उणें. कितिकां देती न दान वसनांचें ॥३१
अमला नसे महात्मा. आहे याहूनिहि शांतनव साजा ॥ ॥
शिवसा पावन आला. ह्याया व्यसन प्रशांत न वसा [illegible] ३२॥

---

१ शिवदास २ कृष्णमिश्र ३ मेघ ४ बाणवृष्टिकगान्यास ५ शीघ्र ६ येजो ७ [illegible] ८ [illegible]
९ दन्तमय १० वस्त्रें ११ मोहसर्प १२ कृपाचार्य

हरवी वाळाकरवीं त्या पांचांचींहि कीर्तिसह वासें ॥ ॥
बुडत्येच संदहिनांच्या बहु थोरांचीहि कीर्त्ति सहवासें ॥ ३३
भीष्माची परमसखा, विजयि हरिजना पहात पावे धी ॥
मग सुरडितांचि रथ तो इषुनीं त्यातें महातपा वेधी ॥ ३४
पार्थहि त्याच्या वेधी, सोडुनि शीघ्र क्षुरप्र वाहोतें ॥ ॥
तत्सूताचेंहि धरी, विजयविशिखें वहत उर प्रवाहातें ॥ ३५ ॥
कुरुकटकांतूनि निघे, रथ घन पटलामधूनि जेविं रवी
हरिजन तेज न ववे षडरांसहि अरि वधूनि जे विरवी ३६
हरिजन हरिस स्तुत्य स्वरिपूंसहि पार्थ सुगति दे वधुनी ॥
आहे याचीहि सदा, चरणप्रभवा सुकीर्तिदेवधुनी ॥ ३७ ॥
हे तें थेन. प्रभु नर, नारायण यांत भेद न गमो जी ॥ ॥
त्यां च्या गुणांपुढें न. त्रिदशांचा आपणासि नगे मोजी ॥ ३८
भूप ह्मणे ज्या एकें, केले बहु हे असे परांसु भट ॥ ॥
तो सोडिला कसा हो. सोडिति जीवा न परि परा सुभट ॥ ३९
हा सोनि नरराज ह्मणे. हाकाळवरि त्वदीय शक्ति मती ॥ ॥
कोतें गेल्या होत्या. चापलतेसह भुजाहि शक्तिमती ॥ ४० ॥

---

१ साधै [illegible] अश्वानें ४ अर्जुनबाणताडित ५ सुकीर्त्तिरूपगंगा ६ हस्त
[illegible]

पार्थ वडु भला तुमच्या तो आजि अपार्थ कापिता माना ॥ ॥
या अभयदा न ह्मा या, नरजाति अपार्थ कां पिता माना ॥ ४१॥
बा न द्रवे अधार्मिक, सर्वहि ये परि न ये नटा कविता ॥ ॥
ास्म हृधार्थ धृत असि, याकरवीं काळही नटाकविता ॥ ४२
जे काय दुरभिमानी, भ्रमती जोडूनि अघ नर सदा ते ॥ ॥
भूपा असदुपदेशद, मरुपथिका जेविं अंघन रसदाते ॥ ४३
जावूं गोधन योधन. वेचावें तूं पुरासि चाल कसा ॥ ॥ ॥
दे कर्णकृपद्रोणां, रथ मजही आतुरासि चोलकसा ॥ ४४ ॥ ॥
भूपाचे उपदेशीं, मग होतां गर्व शांत न वच रणा ॥ ॥ ॥
वद ला विहित हित ह्मणुनि, नमिति मनें सर्व शांतनवचरणां ॥ ४५
परतों लागे जेव्हां, कुरुबळ सोडूनि, दुरूप दीनमनें ॥ ॥
विजय करी पाडुनि शर, भीष्मद्रोणादिगुरुपदीं नमनें ॥ ४६ ॥
मग कुरुपतिचा भेदुनि, मुगुट विखरिला धुळींत मणिगणकीं
भीमीं भक्तिबहु दया, त्याही तज्जन्मपत्रकरगणकीं ॥ ४७ ॥
करि कृष्णसख कुपतिची, कुदशा केवळ तथापि कुरुसेना ॥
परते गरुडसखा, जैसी नागी तसीच कुरुसेना ॥ ४८ ॥

---

१ धनभिन्न २ जल ३ त्वरितगति ४ शिव ५ जन्मपत्रकरणाऱ्या जोशानीं ६ पृथ्वी

परंतु प्रथम परतले, मग नगभित्तनुज[1] वीर तो परतो ॥ ।
नरतेज किति तयाज्या, स्मरतां असुर युवतिसीं न रते ॥ ४९
प्रभुसुरदत्त दराते, वाजवि परिसोनि तद्रवा[2] हगती ॥ ।
मुतती भयें विसरती, त्या कुरुकटकांत भद्र वोह गती ॥ ५०।
जो अभयदेश जातां, मत्स्यपुरा करुनि अभय देशा पथें ॥
जे भयभीत शरणागत कुरुभट त्यांसि अभय देशपथें ॥ ५१
हरुनि यशोधन गोधन, योध अगणित क्षयासि नेवून ॥ ।
त्या नृपपुत्रासि ह्मणे, चाल पुरा हें मनींच ठेवून ॥ ५२ ॥
यद्यपि सत्य वदावें निजगुरुपासीं तथापि त्यासम जो ॥ ॥
तुज बहुमत धर्म प्रभु, तदनुमतें ही कथा पिता समजो ॥ ५३
ह्मण कुरुमर्दन गोधन मोचन इत्यादि कर्म हें माजें ॥ ५४ ॥ ।
अनृतहि हित साधूंच्या, रक्षी प्रेमा नसेंचि हेमाजें ॥ ५४ ॥ ॥
साजेल कसा तुमच्या, आंगींचा मज मुलास पेरावा ॥ ॥
लज्जा फळार्थ कैसा, गुरुकर्णीं अनृत शब्द पेरावा ॥ ५५ ॥
आहे प्रसादकामुक[3], आज्ञा मोडील हा[4] कसा दास ॥ ॥
ह्मणतां तसें ह्मणेलचि, जड कंदर[5] देचि हाक सादास ॥ ५६ ॥

---

१ इंद्रसुत २ अश्व ३ प्रसादेच्छु ४ गुहा ५ शालेय

जय कथन करिति जाउनि, नृपपुत्रसहित दूत नगरानें ॥ ॥
बाळासहि न गिळोंदे, वदनींचा मधुर नूतन गरानें ॥ ५७ ॥ ॥
तीं स्वायुधें शमीवरि, ठेव चितीं राघवा ह्रषाकंपिला ॥ ॥
स्मरुनि कपि उडे विजयश्री ज्यासि भजे जसी नृपा कपिला ५८
गेला गगनपथें ध्वज, जो निजतेजें ह्मणे उभारविला ॥ ॥
पहिला सिंव्हांक ध्वज, पार्थें त्या स्यंदनीं उभा रविला ॥ ५९ ॥
झांकी वपुला क्षनें, वसतां वर्मीं अशिषु ज्हाल्याला ॥ ॥
जाला सारथि पहिल्या, योषावेषासि तो पुन्हां त्याला ॥ ६० ॥
वैराटि रथी केला, सस्मेम बहु श्रितीं न बहु लेकीं ॥ ॥
क्रीडामहत्व त्यातें, विजयजयश्रीविवाहवहुलें कीं ॥ ६१ ॥
विजयी विराट इकडे, ये पूजिति पौर विप्रजन यानें ॥ ॥
येतांचि सभेंत पुसे, प्रेमें त्या उत्तरा स्वतनयातें ॥ ६२ ॥
जन कथिति धेनु कुरुनीं, वळिल्या येवूनि उत्तरा शेला ॥ ॥
त्वत्कीर्तिनें पसरिला, स्वपरित्राणार्थ उत्तरा शेला ॥ ६३ ॥
गेला कुरु जिंकाया, आहे सारथि बृहन्नडा गमला ॥ ॥
सैन्य कुमारचि वदला, लागो अपकीर्तिचा न डाग मला ॥ ६४

---

१ फणसाच्या गरा २ शिवाला ३ नेलाप्रत ४ गाय ५ रथीं ६ रक्तानें ७ शत्रुनाशा न्
न गर्दे शोभ

भूप ह्मण कुरु ह्यांनिल,वारे करितील आजि अभ्र[1] ऐला ॥ ॥
दुःख ह्मदेष्णो लाजें,शिरतां सिंहांत कलम अभ्रमुला ॥ ६५ ॥
अक्षत असाल ते जा,मेळविलें काल आर्यहो यशानें ॥ ॥
लघु गुरु हें द्या धीरां,वीरांच्या सिद्ध कार्य होय शनें ॥ ६६ ॥
हा ह्मनि धर्म ह्मणे हो,विजयि ह्मतातें पहाल नयनाहीं ॥
आहे ब्रहन्नडा जरि,सारथि तरि गोधनांसि भय नाहीं ॥ ६७
सारथि ब्रहन्नडा जरि,उत्तर मांसें भरील तरि भूतें[2] ॥ ॥
परिभूतें होतालचि,तन्मंत्रें करुनि आजि अरिभूतें ॥ ६८ ॥
घालिल ब्रहन्नडा जसि,देवी घाली नराश्मरक्षेमीं ॥ ॥
वादी ह्मणेल उरविन,बाधा घालीन शमरक्षें मी ॥ ६९ ॥
ऐसें धर्म वदे तों,करिती येउनि सभेंत दूत नती ॥ ॥
कथिती विजय कथा जी,देणारी हर्ष नित्य नूतन ती ॥ ७०
देवा कुमार आला,सोडविल्या धेनु पळविलीं कटकें ॥ ॥
न वयप्रमाण तेज,स्विजनीं ह्मणती कवी न तें लटकें ॥ ७१
धर्म ह्मणे आयकिलें,दूतांचें वचन चांगलें कानें ॥ ॥
राया ह्मख रोमांचित,केलें कीं आजि आंग लेंकानें ॥ ७२

१ हत्तिणीस २ भूमीतें ३ शत्रुपिशाच

सारथि बृहन्नडा ज्या, तद्विजयें करुन बायका नवला ॥ ॥
चिंतामणिगल बालक, जो दुर्लभ त्यासि काय कानवला ॥ ७३ ॥
दूतांनें सखउनि नृप, सचिवांसि ह्मणे गुढ्या उभारा हो ॥ ॥
पुर शोभावा पुढें जा, राजपथीं विप्रजन उभा राहो ॥ ७४ ॥
गाजत वाजत साजत, आज तया जतन करुनि आणा हो ॥ ॥
मज मागें मत्स्यांचा, हा रिपुशशिराहु बाहुराणा हो ॥ ७५ ॥
यापरि वदोनि हर्षें, सामोरे सर्व लोक पाठउनी ॥ ॥ ॥
आजि करावी अक्षक्रीडा ऐसें मनांत आठउनी ॥ ७६ ॥ ॥
सर्वस्व समर्पाया, धर्मासि ब्राह्मणासि [१]वांणकसें ॥ ॥ ॥
नृप कृष्णेसि ह्मणेगे, सैरंध्रि मदक्षपात्र आणकसें ॥ ७७ ॥
धर्मासि ह्मणे हूं या, मांडा उकलूनि रम्यतळ पट हो ॥ ॥ ॥
कृष्णाहि ह्मणे गेल्यां, अक्षकरांचें समूळ तळपट हो ॥ ७८ ॥ ॥
द्यूत करूं या ह्मणतां, धर्म ह्मणे आवरूनि धी राहे ॥ ॥
व्यसनोवर्त्तीं पाडिन, निंघोंदे सावरूनि धी राहे ॥ ७९ ॥
हें काम कोप लोभ, प्रमुख महानर्थकोटिचें वतन ॥ ॥ ॥
वर्ते न ह्मणे कवण कितव, धर्महि दुःखांत पावला पतन ॥ ८० ॥

१ गायन नृत्य २ सोंकट्यांचा पट ३ दुःखरूप भोंर्‍यांत ४ निंघसमुद्र ५ हाय

धर्मा नव्हाहि देवेंन, दे वनवास प्रसिद्ध उत्साहें ॥ ॥ ॥
हूं न ह्मणवें विराटा, निर्मील प्राणहानि कुत्सा हे ॥ ८१ ॥
अक्षांसेह शकुनि श्री, ह्री ह्रीं धी कीर्त्तिही कितव देतो ॥ ॥८
आग्रह तरी प्रवर्त्तो, द्यूत नृपा जो सखा हित वदे तो ॥ ८२ ॥
द्यूत प्रवर्त्तनां तो, भूप ह्मणे ऐकिलेंसि कंका तें ॥ ॥ ॥
कुरु जिंकिले कुमारें, वय तरि अद्यापि उचित अकांतें ॥ ८३
धर्म ह्मणे हे कौरव, किति सूत बृहन्नडा कुमारा ज्या ॥ ॥
समरीं अमरींच्याही, तो भय देईल कुंकुमा राजा ॥ ८४ ॥
मत्स्य ह्मणे रे कंका, शंका सोडुनि बोलसी मलतें ॥ ॥ ॥
क्लीबासि मत्सुताधिक ह्मणसी हें वचन मन्मनीं सलतें ॥ ८५
कंका रंका सद्योजातहि, हरि भंगितो करिघटांतें ॥ ॥ ॥
ब्रह्मांडाधिक घटजहि, सेवुनिया सागरा करि घटांतें ॥ ८६ ॥
विप्राधमा जरि मनीं वाचावें हें असेल हो मूक ॥ ॥ ॥
न पुन्हा असें वद सखा, ह्मणवुनि ह्मणतों न जीवितां मूक ॥ ८
धर्म ह्मणे जिंकाया, शक्र न भीष्मादिकां नगारती ॥ ॥ ॥
कुरुगुरु पुढें विरे पर, शक्ति नृपा होय कां न गारातीं ॥ ८८

---

१ द्यूत कोडन २ फाशासह ३ लज्जा ४ अगस्ती ५ इंद्र

त्यावरि बृहन्नडाचि. प्रौढा जसि दानवावरि भवानी॥ ॥ ॥
गावें यादोघींचें, यश भूपा आदरें हरिभवांनी॥ ८९ ॥
कुरुगुरुसवें झगडतां, त्या स्मरगुरुचेहि ओंठ कर पावे॥ ॥
विंध्यस्कंधग शिशुचा, कां विधुच्या मंडळा न कर पावे॥९०
ऐसें सत्य वदे जों, तों घाली माळ अक्षमा राया॥ ॥ ॥
शिकवी युधिष्ठिराच्या, भाळीं पाणिंस्थ अक्ष माराया॥९१॥
अक्षप्रहार होतां, वाहो लागे अशुद्ध नाकानें॥ ॥ ॥
तें स्वांजळींत धरिलें, त्या शांतिक्षांतिविजितनाकानें॥ ९२॥
धर्माभिप्रायज्ञा, कृष्णा तारांत तें धरी रगत॥ ॥ ॥
पतिहृद्गत साध्वीनें, नाडीनें जाणिजे शरीरगत॥ ९३ ॥
तों तो उत्तर आला, द्वारस्थांनी नृपासि जाणविला॥ ॥
तेणें अत्युत्कंठित, होउनि भेटावयासि आणविला॥ ९४ ॥
तेव्हां कंक हळूच, क्षत्त्यासि ह्मणे बृहन्नडा राहो॥ ॥
पाहो न हें शोणित न, तत्क्षोभें रक्त नृपतिचें वाहो॥ ९५ ॥
रण नसतां मद्देहीं, जो क्षत कीं क्षतजलेश काढील॥ ॥
तो तत्काळ वधावा, जरि त्याला अमृत शक्र वाढील॥ ९६॥

---

१ हरिहृगनी २ क्रोध ३ हातांनील ४ फासा ५ रक्त ६ धर्मराजानें ७ सारथी

हा सत्य तत्प्रतिज्ञा, या राजाचें ह्मणोनि हो हित रे ॥ ॥
मारील विराटातें, हें माझें देखतांचि लोहित रे ॥ ९७ ॥ ॥
क्षत्यानें गुंतवितां, जरि अक्षत तरि निराकुल क्षण सा ॥ ॥
राहे बाहेर प्रभु, परम सुलक्षणहि तो कुलक्षण सा ॥ ९८ ॥
उत्तर पित्यासि वंदुनि, पाहे कंकासि तो सभाकोणीं[1] ॥ ॥
तातासि पुसे ऐसा, केला अन्याय हा महा कोणी ॥ ९९ ॥
भूप ह्मणे पुत्रा म्यां, केला स्वकरेंचि दंड या कंका ॥ ॥ ॥
कीं हा करि प्रशंसा, षंढाची नच धरी मनीं शंका ॥ १०० ॥
उत्तर ह्मणे अहाहा, केला अन्याय हा धरा पाय ॥ ॥ ॥
ब्रह्मक्षोभ स्वर्गा[2], पायहि केवळ नव्हे धरा[3]पाय ॥ १०१ ॥
नमुनि विराट ह्मणे बा, कंका चुकलों महायशा पावें ॥ ॥
न मला सख्या तुवां या, मदया घेउनि सहाय शापावें ॥ १०२
कंक ह्मणे सोड चरण, मज सोसावें असें जरि न कळतें ॥
गळतें रक्त महीवरि, तरि हें त्वद्राष्ट्र तत्क्षणीं जळतें ॥ १०३
शमतां शोणितधारा, संपादी धर्मराज तो शुचिता ॥ ॥
तों ये बृहन्नडा मग, दावी जी रीति आपणा उचित ...

१ सभेच्या कोपऱ्यांत २ स्वर्ग हानिकर ३ पृथ्वीनाशक

राजा ह्मणे कुमारा या रत्तें लाज त्या कुमारा हो ॥ ॥ ॥
निंदुनि इंद्रुनिभ यशा क्षण मौनव्रतपरा उमा राहो ॥ १०५ ॥
त्वां जिंकिला कसा तो अश्वत्थामा तसाचि तो कर्ण ॥ ॥
तोहि द्रोण महात्मा दिव्य धनुर्वेद शंभ गोकर्ण ॥ १०६ ॥ ॥
केला कसा कृपाचा, भंग कसा पळविला सुयोधन गा ॥ ॥
कैसा भीष्म प्रमुखां, स्वभुज अशनि कळविला सुयोधनगा ७
उत्तर ह्मणे पित्या कुरु, पाहुनि झालों भयाकुळ पळालों ॥ ॥
सिंह प्रेक्षुनि यूथभ्रष्ट कलभ सा च मी बहु गळालों ॥ १०८ ॥
मरणेच्छु निर्धनातें, दाता सोडूनि सुजळ दे वसु तें ॥ ॥ ॥
जैसें यश तैसें हें केलें महद्दन उजळ देवसुतें ॥ १०९ ॥
मज सारथी करुनि रथि, झाला विद्या प्रकाम रुद्रा ज्या ॥ ॥
ठाव्या त्या देवसुता, बहुमत तो त्र्यंबका मरुद्राजा ॥ ११० ॥
दिव्य दराच्या नादें, निर्सुनि त्या कुरुबळांत आधीतें ॥ ॥
हरिलें होतें गोधन, जें सोडविलें पळांत आधींनें ॥ १११ ॥
आधीं कर्ण पळविला, मग केला विरथ तो कृप हि राया ॥ ॥
शकला न एकही त्या देवसुताच्या यशाहि नृप राया ॥ ११२ ॥

---

१ षडानन २ गजबालकवत् ३ यथेष्ट ४ इंद्रास ५ मनोल्हास धनुर्वेदस्वरूप शंभूस गोकर्णासारखे

अरिसेनेसि न वरतें, पाहूंदे जेविं साधु कुल रेनें ॥ ॥ ।=
काय वदूं गुरु गुरुसुत, जिंकुनि भीष्मावरीहि उलटे नें ॥११३
श्रीमद्भीष्मासहि तो, निजशस्त्रास्त्रप्रवीणता कळवी ॥ ।■
पळवी सुयोधनातें, त्यासकट तदाश्रितानने मळवी ॥११४
संमोहनास्त्र योजुनि, सर्वांसहि देवपुत्र मग मोही ॥ ॥
हरिहरलीलेहून, न्यूना लीला तुह्मासि न गमो ही ॥ १५ ॥
मत्स्य ह्मणे तद्दर्शनें, तुज घडलें तें मलाचि कां नाहीं ॥ ॥
नेत्रें बहु तळमळती, लाभ मिळविला मलाचि कां नाहीं ॥१६
सर्वस्वें पूजावा, तो आह्मा मायबापसा मान्य ॥ ॥ ॥
लीलेनें हरिला जरि, तेणें हा ताप काय सामान्य ॥ ११७ ॥
सांग कसें तुज दिसतें तो मज दावील काय पाय सखा ॥
याहुनि उणाचि दुकुळीं, ह्मणता हो पुष्ट काय पायस खा १८
उत्तर ह्मणे उद्यां कीं, परवा भेटेल तो असें वाटे ॥ ॥
जळ कारुण्यहि विनतां, तुगतचि सोडील नें कसें वाटे ॥१९
समजावेंचि परि न त्या, यमधर्मवरेंचि तत्व तें समजे ॥ ॥
सज्ञाना तत्करुणे, वाचुनि मतिचे न चालती गमजे ॥१२० ॥

---

१ विराट २ हरणकेला ३ सरवलभूमी-नम्र.यांस अनुकुल

राजाज्ञेनें वस्त्रें, कुरुवीरांचीं बृहन्नडा उचली ॥ ॥ ॥
त्या उत्तरेसचि न ती, भेरि बहुत सकविमतिसही रुचली ॥ २१ ॥
कन्येसि असीं वस्त्रें ओपी निर्मवियासि बाहुलि हा ॥ ॥
श्रोतेहो स्फलकीं, प्रेमें श्रितकल्पवृक्ष बाहुं लिहा ॥ २२ ॥
शोभा सोडुनि होता. शुद्ध वसंतीं करीरसा पार्थ ॥ ॥ ॥
मग मंत्रांतें व्हाया, उद्धव संतीं करी रसों पार्थ ॥ २३ ॥
मंत्र नृपसकतासीं हाहि उद्याचाहि तो दिवस जावा ॥ ॥
परवां बैसोनि पदीं, धर्म प्रभु द्यावया शिव सजावा ॥ २४ ॥

इतिश्री आर्याभा॰ उत्तरगोग्रहः संपूर्णः

अच्युत पदासि चिंतुनि, सानुज धर्म स्ववेष घेऊनि ॥ ॥
सदिनीं वसे नृप पदीं, त्या मत्स्याच्या सभेंत येऊनी ॥ १ ॥
मागुनि विराट येउनि, हांसोनि ह्मणे सभासदा कंका ॥ ॥
भद्रासनीं बसाया, आजि तुज कसी न वाटली शंका ॥ २ ॥
अर्जुन ह्मणे नृपा हा, हरिच्या अर्धासनीं बसायाचा ॥ ॥
आहे प्रताप महिमा, विख्यात जगत्त्रयीं असा याचा ॥ ३ ॥

---

१ आश्रितकल्पवृक्ष २ नेसी ३ मसलत ४ आनंद ५ जरासंधरूद्धभूपार्थ

गंधर्वोसि हरि ह्मणे,याचींच यशें करूनि तांडव गा॥ ॥
हा पुण्यश्लोक प्रभु,सम्राट सद्गुणसमुद्र पांडव गा॥ ४ ॥
मत्स्य ह्मणे पांडव हा,तरि भीमप्रमुख बंधु जे चवघे॥ ॥ ॥
कोठें कृष्णा कोठें,जीस क्षणहि न विसंबती अवघे॥ ५ ॥
पार्थ ह्मणे सूद तुझा,बल्लव मगधेंद्रकाय हा चिरिता॥ ॥ ॥
करिता झाला सूतान्वयसागर भीम काय हाचि रिता॥ ६ ॥
हयपाळ जो नकुळ तो,गोपाळक तोचि होय सहदेव॥ ॥ ॥
अर्जुन बृहन्नडा मी,भिडलों ज्या चापपाणिसह देव॥ ७ ॥
सैरंध्री हे कृष्णा,मेला कीचक इला अनादरितें॥ ॥ ॥
हे किति हरसुरज उदधि,व्हावे क्षोभें इच्या अनादरितें॥ ८
अज्ञातवास दुर्घट,परि निर्विघ्न त्वदाश्रयें घडला॥ ॥ ॥
होतों सुखरूप तुझ्या,गर्भांत श्रम न लेशही पडला॥ ९ ॥
उत्तरहि पांडवांतें,वर्णुनि कळवी पुन्हां स्वजनकास ॥ ॥
कीं हेचि घालणारे,व्यसनीं तारावया स्वजन कास॥ १० ॥
भूप ह्मणे त्वां अर्जुन,पूजावा सर्वकाळ भीमहि म्या॥ ॥
न असत्य हरिजनाच्या,सोडुनि यां गर्व काळ भी महिम्या॥ ११

१ नृत्य २ सार्वभौम ३ स्वैपाक्या ४ जरासंधदेह ५ कीचकवंशसमुद्र ६ शिवा
[illegible]

वत्सा कांथ वदोरे, धर्मात्मा धर्महा असा मान्य ॥ ॥ ॥
म्यां ताडिला ललाटीं, असें अपराध हा असामान्य ॥ १२ ॥
सचिवांहीं म्यां त्यांही, प्रार्थावा धर्मराज कन्या या ॥ ॥
धावी धनंजयाला, पोटीं घालावयासि अन्याया ॥ १३ ॥
उत्तर ह्मणे बहुबरें न करून अपराध घडति परिसाचे ॥ ॥
साधु क्षमी यशस्कर, घनहि क्ष्मापंत पडति परिसाचे ॥ १४ ॥
भेटे विराट राजा, त्या पांचां पांडवांस गुरुसाच ॥ ॥ ॥
व्यसनांत आश्रमप्रद, अन्न प्रद वृद्ध होय गुरु साच ॥ १५ ॥
धर्मोसि ह्मणे बाप्पा, साधो जोडा नसेचि या दिवसा ॥ ॥
स्वपदीं सचिनीहीं, संपादुनि क्रतजयदयादि वसा ॥ १६ ॥
तूंचि बळी स्वजनांसह, तरलासि हि वायुनंदनबनौका ॥ ॥
वरिति क्रमति सत्संगति, उतराया, वोधि मंद नव नौका ॥ १७
तारुनि परासि तरती, हरिजन जें वर्णिलें असें कविनीं ॥ ॥
नें दाविलें मज तुह्मी कुरुकुल संतति सरोजिनीरविनीं ॥ १८
राज्यादि सर्व दिधलें, तुज म्यां हें आपुलें असें ह्मण गा ॥ ॥
शशिचूड नको न ह्मणे, धुतऱ्याचें फूल वाहत्या भ्रमणगा ॥ १९

---

१ हतोडे २ संकटांत ३ भीमवननिवासा ४ समुद्र ५ चंद्रशेखर ६ भिकाऱ्यास

धर्मा धनंजयवधू, होउ ह्मणों धन्य भाग्य मत्तनया ॥ ।
देसील मान वचना, तूंचि प्रभु अन्य भाग्यमत्त नया ॥ २० ।
पाहे धर्म धनंजयवदनातें, ते धवांनेर वदे तो ॥ ॥
तें परिसिते ह्मणति सख, याहुनि हरिषेणुचा न रवे देतो २१
प्रेम तुझें आह्मानार, ऐसेंचि दयासुधानदा राहो ॥ ।
अभिमन्युची वधू हो, ती माझी बा सुधा न दारा हो ॥ २२ ।
केविं वरावी वर्त्तत, होती कीं एक वर्ष कन्यासी ॥ ॥ ।
हरि जनकथेंत शिरतां, न विशंकावे शुकादि संन्यासी ॥ २३
तो साधुजनां तोरषेद, ओरवदसा होय खळजनां भाचा ॥ ।
योग्य तुला जामाता, बहिश्चर प्राण जळजनोभाचा ॥ २४ ।
मत्स्य ह्मणे बा धर्मा, वंद्य तुझें वंदनावना शील ॥ ॥
त्रिजगदघानें तुमचें, पुण्यलताकंद नांव नाशील ॥ २५ ॥
देवा सौभद्रार्थ, स्वीकारावी तुह्मीच कन्या हो ॥ ॥ ॥
घ्या पदरीं हे संतति, या संबंधें जगांत धन्या हो ॥ २६ ॥
धर्म ह्मणे बहु उत्तम, हें मज अश्लाघ्य कायहो नातें ॥ ॥
मिळतां सुवर्णमुद्रा, अर्थी इच्छील काय होनातें ॥ २७ ॥

---

१ अर्जुन २ शब्द ३ कृष्णाचा ४ वंदनकर्त्यांचे रक्षणाविषयीं

धाडूनि दूत धर्मे आप्तांला हा विवाह जाणविला ॥ ॥ ॥
अभिमन्यु राम कृष्णा, द्रुपद स्वकुमारवर्ग आणविला ॥ २८ ॥
आणुनि संपत्ति दिल्या श्रीकृष्णें भक्तनायका सारा ॥ ॥ ॥
तो आरतांचि आला, भेटाया मेघ काय कासारा ॥ २९ ॥
अभिमन्युविवाहोत्सव, जग निववी जेविं चंद्र पुनवेचा ॥ ॥
धर्म ह्मणे हूं कनकें, मणि बहु वस्त्रान्नराशिहुनि वेंचा ३० ॥
नट नर्तकीगणातें, धर्म ह्मणे रामकृष्ण गानाचा ॥ ॥ ॥
नृत्याचा रस शिवसे, जाणति जा त्यांपुढेंचि गा नाचा ॥ ३१॥
भीम ह्मणे वाढा हो, स्वस्थपणें भूमिदेव जेवा जी ॥ ॥
चालूं नका बसाया, घ्या व्हावे जे महेभ जे वाजी ॥ ३२ ॥
राम ह्मणे घालाव्या, कुडक्या चारींहि याच कानीं कीं ॥ ॥
पुनि भूषवितां भासे, मूर्त्त स्वर्वृक्ष याचकालीकीं ॥ ३३ ॥
सहदेव नकुळ अर्जुन, अच्युत बळ भीम धर्म नव्याही ॥ ॥
त्या नात्यासि न मिरविति, ते रमति विराटबंधु न व्याही ॥ ३४
श्रोतेहो वर्णावें, किति मज गण्यी असें वदाना कीं ॥ ॥
सत्स्य उपप्लव्यपुरीं, उत्सव बहु होय हो तदा नाकीं ॥ ३५ ॥

---

१ धर्मराजास २ सारभूत ३ सरोवरास ४ महागज ५ याचकमंडळींत ६ स्वर्ग

वदवि मयूराकरवीं, श्रीराम विराटपर्व चवथें वा ॥ ॥
स्वदृष्य ह्मणोनि न सोडी, अमृताची शक्ति सर्व वक्त्यें वा ३६
राम घनमत्सप्रसादा, मृन जों जों बहु वळोनि वर्षतसे ॥ ॥
तों तों भक्त मयूर स्वांयाकेका करूनि हर्षतसे ॥ ३७ ॥

१ स्वकीय आर्या रूप मयूर वाणी

॥ इतिश्रीमदार्याभारतेश्रीरामानंदमयूरेश्वरकृतौ ॥
॥ विराटपर्वसमाप्तम् ॥

हे पुस्तक सदाशिवबजाबाशास्त्री अमरापुरकरयानीं भाऊ शास्त्री अष्टपुत्रे यांच्या मदतीनें शुद्धकरून आणि सुलभ होण्याकारितां पदें पाडून व दुर्बोध शब्दांवर टिपा घालून मुंबईंत ज्ञान दर्पण छापखान्यांत छापिलें शके १७७४ परिधावीनामसंव० माहे भाद्रपदशुद्ध ९ ५ ७